दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | मंगळवार, दि. १९ मे, २०२६ | वर्ष - १ | अंक - २३३ | पाने - ४

पुणे/पिंपरी-चिंचवड


### आजचे पंचांग

मंगळवार, १९ मे २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, ग्रीष्म ऋतु, अधिक ज्येष्ठ मास, शुक्लपक्ष, तृतीया दुपारी २-१९ पर्यंत नंतर चतुर्थी तिथी, दिवस नक्षत्र– मृगशीर्ष सकाळी ८-४२ पर्यंत नंतर आर्द्रा, चंद्र रास - मिथुन, सूर्य रास - वृषभ, गुरु रास - मिथुन

### फुलांचे दर निम्म्यावर

**पुणे** : गुलटेकडी मार्केट यार्डातील घाऊक फुलबाजारात सर्व प्रकारच्या फुलांची आवक स्थिर आहे. अधिक मास सुरू होऊन लग्नसराई संपल्याने सजावटीसाठी लागणाऱ्या डच गुलाब, कार्नेशियन, जर्बेरा, लिलियम, ऑर्चिड तसेच केशरचनेसाठी लागणाऱ्या जिप्सोफिला, मोगरा आदी फुलांच्या मागणीत मोठी घट झाली आहे. बाजारात दाखल झालेल्या फुलांच्या तुलनेत मागणी खूपच घटल्याने या फुलांचे दर गेल्या आठवड्याच्या तुलनेत निम्म्यावर आले आहेत.

## सारांश वृत्त

### रिझर्व्ह बँकेचे परिस्थितीवर लक्ष

**मुंबई** : रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी सांगितले की, पुरवठ्याचे धक्के सर्वसाधारण किंमतीच्या पातळीवर येतात की नाही यावर रिझर्व्ह बँक बारीक लक्ष ठेवून आहे. मल्होत्रा म्हणाले की, आरबीआय जून २०२५ पासून तटस्थ भूमिका घेत आहे, ज्यामुळे त्यांना दृष्टिकोनात चपळ राहण्याची आणि येणाऱ् या डेटा आणि माहितीला विवेकपूर्ण प्रतिसाद देण्याची लवचिकता मिळते.

### काँग्रेसचा उत्तराखंड सरकारवर निशाणा

**डेहराडून :** उत्तराखंड सरकारने डेहराडूनमधील बिघडलेल्या कायदा व सुव्यवस्थेबाबत राज्य सरकारला प्रश्न उपस्थित केला आणि राज्य सरकार व्यापारी आणि महिलांसह सामान्य नागरिकांचे संरक्षण करण्यात अपयशी ठरल्याचा आरोप केला. उत्तराखंड काँग्रेसच्या मुख्य प्रवक्त्या गरिमा दसौनी यांनी एका निवेदनात म्हटले आहे की, बजरंग दलाच्या सदस्यांनी राजपूर रोडवरील फुटवेअर शोरूममध्ये मुस्लिम कर्मचाऱ् यांना सामोरे जावे आणि त्यांच्या नावाच्या टॅगवर "जिहादी" लिहिल्याच्या अलीकडील घटनेचा उल्लेख केला.

### मेरठमध्ये दोन ड्रग्ज तस्करांना अटक

**मेरठ :** उत्तर प्रदेशच्या मेरठ जिल्ह्यात पोलिसांनी सोमवारी दोन अंमली पदार्थ तस्करांना अटक केली आणि आठ किलोहून अधिक गांजा आणि चरस, देशी पिस्तूल आणि रोख रक्कम जप्त केली. अंमली पदार्थांच्या तस्करीविरोधात कारवाई करत सदर बाजार पोलिस ठाण्याच्या पथकाने राजबन चौकी परिसरात छापा टाकला आणि शुभम उर्फ शिब्बू याला अटक केली.

### पश्चिम आशियातील तणाव आणि वाढत्या ऊर्जा संकटाच्या पार्श्वभूमीवर

# सरकारी वित्तीय संस्थांना काटकसरीचे निर्देश

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**नवी दिल्ली** : पश्चिम आशियातील तणाव आणि वाढत्या ऊर्जा संकटाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने सरकारी बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका, सरकारी विमा कंपन्या आणि सार्वजनिक क्षेत्रातील वित्तीय संस्थांसाठी काटकसरीचे कठोर निर्देश जारी केले आहेत. अनावश्यक खर्च टाळणे, प्रवासावर नियंत्रण ठेवणे आणि शक्य तितक्या बैठका व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे घेणे बंधनकारक करण्यात आले आहे.

अर्थ विभागाने जारी केलेल्या निर्देशांनुसार, सरकारी बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका, सरकारी विमा कंपन्या आणि सार्वजनिक क्षेत्रातील वित्तीय संस्थांनी तातडीने खर्च नियंत्रणाचे उपाय अमलात आणावेत. कार्यालयीन कामकाजात ऊर्जा बचतीला प्राधान्य देणे, इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढवणे आणि अनावश्यक प्रशासकीय खर्च टाळणे, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. सरकारने स्पष्ट केले आहे की, समीक्षा बैठका, सादरीकरणे, सल्लामसलत आणि प्रशासकीय बैठकांसाठी शक्य तितक्या प्रमाणात व्हिडीओ कॉन्फरन्सिंगचा वापर करावा. प्रत्यक्ष बैठकांना केवळ अत्यावश्यक परिस्थितीतच परवानगी दिली जाईल. यामुळे प्रवास खर्चात बचत होईल, तसेच इंधन वापरही कमी होईल, असा सरकारचा उद्देश आहे. देशांतर्गत आणि परदेश दौऱ्यांवरही खर्च नियंत्रण ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. परदेश दौरे अत्यावश्यक असल्यासच मंजूर केले जातील. अशा दौऱ्यांसाठीही शक्य तितका कमी खर्च करावा आणि आवश्यकतेपुरतेच प्रतिनिधीमंडळ पाठवावे, असे निर्देश देण्यात आले आहेत.

केंद्र सरकारचे हे निर्देश सरकारी बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका, सरकारी विमा कंपन्या आणि सार्वजनिक क्षेत्रातील वित्तीय संस्थांना लागू असतील. या सर्व संस्थांनी काटकसरीचे उपाय तातडीने राबवून त्याबाबतची अंमलबजावणी सुनिश्चित करावी, असेही सांगण्यात आले आहे.

अमेरिका-इराण तणावामुळे कच्च्या तेलाच्या किमती वाढत आहेत. त्याचा परिणाम भारताच्या ऊर्जा खर्चावर होत असल्याने केंद्र सरकारने विविध विभागांना आणि वित्तीय संस्थांना खर्च नियंत्रणाचे उपाय राबवण्यास सांगितले आहे. ऊर्जा आयातीवरील वाढता खर्च, इंधन दरातील चढ-उतार आणि जागतिक पुरवठा साखळीतील अनिश्चितता लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आल्याचे मानले जात आहे.

इंधनपुरवठ्यातील अडचणी आणि दरवाढ याचा परिणाम सर्वसामान्यांच्या दैनंदिन जीवनावरही दिसू लागला आहे. राज्यभरात भाजीपाल्याचे दर वाढले असून अनेक भाज्यांचे दर प्रतिकिलो ८० ते १०० रुपयांच्या घरात गेले आहेत. दूध, भाजीपाला आणि इंधन दरवाढीमुळे सर्वसामान्यांच्या खर्चात वाढ झाली आहे. ऊर्जा संकटाचा परिणाम सरकारी खर्चावरच नव्हे, तर बाजारपेठेतील दरांवर आणि नागरिकांच्या जीवनमानावरही होत असल्याचे चित्र आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने सार्वजनिक क्षेत्रातील वित्तीय संस्थांना काटकसरीचे निर्देश देत खर्च नियंत्रणाच्या उपाययोजनांना सुरुवात केली आहे.

# आरसीसी कोचिंग क्लासेसच्या शिवराज मोटेगावकरला अटक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लातूर** : देशभरात खळबळ उडवून देणाऱ्या नीट पेपरफुटीप्रकरणाचे धागेदोरे महाराष्ट्रात सापडले असून सीबीआयने कारवाईचा धडाका सुरू ठेवला आहे. या प्रकरणातील लातूर कनेक्शन अधिक गडद झाले असून लातूरमधील प्रसिद्ध आरसीसी कोचिंग क्लासेसचे शिवराज मोटेगावकर यांना सीबीआयने अटक केली आहे. न्यायालयाने त्यांना ९ दिवसांची सीबीआय कोठडी सुनावली आहे.

सीबीआयने यापूर्वी शिवराज मोटेगावकर यांची ट्रान्झिट रिमांड घेतली होती. दोन दिवसांच्या प्राथमिक चौकशीत त्यांच्याकडून महत्त्वाची माहिती आणि काही पुरावे मिळाल्याचा दावा सीबीआयने केला. त्यानंतर त्यांना अटक करून आज सीबीआय न्यायालयात हजर करण्यात आले.

सीबीआयच्या माहितीनुसार, शिवराज मोटेगावकर यांनी २३ एप्रिल रोजी केमिस्ट्रीचा पेपर मिळवला होता. त्यांच्या मोबाईलमध्ये लीक झालेली प्रश्नपत्रिका आढळल्याचा दावा तपास यंत्रणेने न्यायालयात केला. तसेच, सेवानिवृत्त प्राध्यापक प्रल्हाद कुलकर्णी यांच्यासोबत मोटेगावकर पेपरफुटीत सहभागी असल्याचे तपासात समोर आल्याचे सीबीआयने सांगितले.

न्यायालयात सुनावणीदरम्यान न्यायाधीशांनी तपास अधिकाऱ्यांना विचारले की, मोटेगावकर यांच्याकडे प्रश्नपत्रिका असल्याचे तुम्हाला कसे कळले? त्यावर तपास अधिकारी पवन कौशिक यांनी सांगितले की, निवृत्त प्राध्यापक कुलकर्णी हे शिवराज मोटेगावकर यांच्या संपर्कात होते. त्यातूनच ही बाब समोर आली. कोचिंग सेंटरमार्फत प्रश्नपत्रिकांचे वितरण सुरू होते, अशी माहितीही त्यांनी न्यायालयात दिली.

# इराणचा अमेरिकेला इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : इराण आणि अमेरिका यांच्यातील तणाव पुन्हा एकदा धोकादायक वळणावर पोहोचला आहे. ४० दिवसांच्या युद्धविरामानंतरही दोन्ही देशांमधील संघर्ष पूर्णपणे शमलेला नाही. अशातच इराणकडून अमेरिकेला देण्यात आलेल्या तीव्र इशाऱ्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर खळबळ उडाली आहे.

इराणचे एक्सपीडियन्सी कौन्सिल सदस्य आणि इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्सचे माजी कमांडर मोहसेन रझाई यांनी अमेरिकेला थेट इशारा दिला आहे. “अमेरिकेने इराणी बंदरांवरील नौदल घेराबंदी हटवली नाही, तर ओमानचा समुद्र अमेरिकन सैन्यासाठी स्मशानभूमी ठरेल,” असे रझाई यांनी म्हटले आहे.

इराणच्या सरकारी दूरचित्रवाहिनीवर बोलताना रझाई यांनी अमेरिकेच्या कारवायांना युद्धजन्य कृती असे संबोधले. इराणच्या समुद्री मार्गांवर आणि बंदरांवर दबाव आणण्याचा प्रयत्न सुरू असून, त्याला प्रत्युत्तर देणे हा इराणचा अधिकार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्यांच्या या विधानानंतर तणाव पुन्हा वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. रझाई यांनी दावा केला की, अमेरिकेची घेराबंदी जितकी जास्त काळ कायम राहील, तितका त्याचा परिणाम जागतिक व्यापारावर होईल. विशेषतः तेल वाहतूक आणि आंतरराष्ट्रीय समुद्री मार्गांवर त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात. तणाव कमी करण्यासाठी राजनैतिक चर्चा सुरू असल्या, तरी अमेरिकेने प्रामाणिक भूमिका घेणे आवश्यक आहे, असेही त्यांनी म्हटले.

### मुख्यमंत्री फडणवीस यांची घोषणा

# तीर्थक्षेत्रे, ऐतिहासिक स्थळांसाठी ९९३.७२ कोटी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : राज्यातील ऐतिहासिक, धार्मिक आणि सांस्कृतिक वारसा लाभलेल्या गडकिल्ल्यांचे जतन व संवर्धन करण्याला राज्य शासनाने सर्वोच्च प्राधान्य दिले असून, तीर्थक्षेत्र विकास आराखड्यांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. भाविक आणि पर्यटकांसाठी अत्याधुनिक पायाभूत सुविधा, दर्जेदार आरोग्य यंत्रणा आणि पर्यटनपूरक व्यवस्था उभारण्यावर भर देण्यात येणार आहे. सोमवारी मंत्रालयात झालेल्या उच्चस्तरीय शिखर समितीच्या बैठकीत राज्यातील प्रमुख सहा तीर्थक्षेत्रे आणि ऐतिहासिक स्थळांच्या विकासासाठी एकूण ९९३.७२ कोटी रुपयांच्या आराखड्यांना मंजुरी देण्यात आली.

सह्याद्री अतिथीगृह येथे विविध तीर्थक्षेत्र विकास आराखडा शिखर समितीची बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, वनमंत्री गणेश नाईक, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, आमदार दिलीप वळसे पाटील, आमदार धनंजय मुंडे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत तीन जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांनी सादर केलेल्या सहा महत्त्वाच्या प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सर्व विकासकामे दर्जेदार असावीत आणि ती निश्चित कालमर्यादेत पूर्ण व्हावीत, असे स्पष्ट निर्देश प्रशासनाला दिले. तीर्थक्षेत्रे आणि ऐतिहासिक स्थळांच्या विकासात केवळ बांधकामांवर भर न देता वारसा जतन, पर्यावरण संवर्धन, भाविकांची सोय, वाहतूक नियोजन आणि स्थानिक पर्यटनवाढ या सर्व बाबींचा समन्वय साधण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

पुणे जिल्ह्यातील ज्योतिर्लिंग क्षेत्र भीमाशंकरच्या सर्वांगीण आणि शाश्वत विकासासाठी १७२.२२ कोटी रुपयांचा आराखडा मंजूर करण्यात आला आहे. हे काम मे २०२७ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी सध्याचे २.७ मीटर रुंदीचे अरुंद रस्ते ७ मीटरपर्यंत रुंद करण्यात येणार आहेत. तसेच वळण रस्ते, अत्याधुनिक बसस्थानक, मंदिर परिसरातील पादचारी मार्ग, कव्हर्ड कॉरिडॉर, फ्लोअरिंग, एम्फीथिएटर, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प, नवीन पोलीस स्टेशन आणि विश्रामगृह उभारण्यात येणार आहे. आमदार बाबाजी काळे यांच्या सूचनांचाही यात समावेश करण्यात आला आहे.


जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या देहू येथील जन्मस्थान मंदिर, वैकुंठगमन मंदिर परिसर आणि भंडारा डोंगर परिसराच्या ऐतिहासिक संवर्धनासाठी ४१.७१ कोटी रुपयांचा आराखडा मंजूर करण्यात आला आहे. या अंतर्गत रस्त्यांचे सुशोभीकरण, स्वच्छता व्यवस्था, २४ तास पिण्याचे पाणी, सुसज्ज पार्किंग, निवास सुविधा आणि माहिती केंद्र उभारण्यात येणार आहे.

भंडारा डोंगर परिसरात हरित क्षेत्र संवर्धन आणि वृक्षारोपण करून नैसर्गिक सौंदर्य अबाधित ठेवण्यावर भर दिला जाणार आहे. आमदार सुनील शेळके यांच्या सूचनांनुसार काही कामांचा समावेश या आराखड्यात करण्यात आला आहे.

### १६ जागांसाठी १८ जूनला मतदान

# विधान परिषदेचा निवडणूक कार्यक्रम जाहीर

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई** : निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांतील द्वैवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. राज्यातील १६ स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांतून विधान परिषदेचे सदस्य निवडले जाणार आहेत. निवडणूक कार्यक्रम जाहीर होताच संबंधित मतदारसंघांमध्ये आचारसंहिता तत्काळ प्रभावाने लागू करण्यात आली आहे.

जाहीर कार्यक्रमानुसार २५ मे रोजी अधिसूचना प्रसिद्ध होणार आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख १ जून आहे. अर्जांची छाननी २ जून रोजी होईल, तर उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत ४ जून निश्चित करण्यात आली आहे. या निवडणुकीसाठी मतदान १८ जून रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत होणार आहे. मतमोजणी २२ जून रोजी होणार असून २५ जूनपूर्वी संपूर्ण निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे. निवडणूक आयोगाने संबंधित प्रशासनाला आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या सूचना दिल्या आहेत. संबंधित स्थानिक संस्थांमध्ये किमान ७५ टक्के स्थानिक स्वराज्य संस्था कार्यरत असणे आणि ७५ टक्के मतदार असणे अनिवार्य आहे. यापूर्वी ही अट पूर्ण न झाल्यामुळे या निवडणुका लांबणीवर पडल्या होत्या. आता महाराष्ट्राच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी या अटींची पूर्तता झाल्याचा अहवाल दिल्यानंतर आयोगाने निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. या निवडणुकीत पुणे, सोलापूर, अहमदनगर, ठाणे, नाशिक, जळगाव, सांगली-सातारा, नांदेड, यवतमाळ, भंडारा-गोंदिया, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग, वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली, अमरावती, उस्मानाबाद-लातूर-बीड, परभणी-हिंगोली आणि औरंगाबाद-जालना या मतदारसंघांचा समावेश आहे.

### रुपाली चाकणकरांना ईडीकडून समन्स

**मुंबई** : भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणात अंमलबजावणी संचालनालय अर्थात ईडीने राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रूपाली चाकणकर यांना समन्स बजावले आहेत. त्यांना याच आठवड्यात चौकशीसाठी हजर राहण्याचे निर्देश दिल्याची माहिती समोर आली आहे. दोन दिवसांपूर्वीच विशेष तपास पथकाने या प्रकरणात काही महत्त्वाच्या व्यक्तींची चौकशी केली होती. त्यानंतर ईडीच्या एन्ट्रीमुळे प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे. अशोक खरात याच्याशी संबंधित आर्थिक व्यवहार, मनी लॉन्ड्रिंग, देणग्या आणि संशयास्पद मालमत्ता व्यवहारांची चौकशी ईडीकडून केली जात आहे.

# एसटी प्रवास महागण्याची चिन्हे

### परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांचे संकेत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : इंधन दरवाढीचा फटका आता एसटी प्रवाशांनाही बसण्याची शक्यता आहे. डिझेलच्या दरात झालेल्या वाढीमुळे एसटी तिकीट दरात वाढ करावी लागू शकते, असे संकेत परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले आहेत. एसटी महामंडळाला डिझेलसाठी विशेष सवलत मिळाली, तर दरवाढ टाळता येईल. मात्र, अशी सवलत न मिळाल्यास तिकीट दरवाढ अपरिहार्य ठरेल, असे सरनाईक यांनी सोमवारी स्पष्ट केले.


माध्यमांशी बोलताना प्रताप सरनाईक म्हणाले की, एसटी महामंडळाला दररोज १० लाख ८७ हजार लिटर डिझेलची गरज भासते. हा डिझेल पुरवठा इंडियन ऑईलकडून केला जातो. मागील आठवड्यात डिझेलच्या दरात प्रति लिटर ३ रुपयांची वाढ झाली आहे. या दरवाढीमुळे महामंडळाला दररोज ३३ लाख ७० हजार रुपये अतिरिक्त मोजावे लागत आहेत. या वाढीचा वार्षिक परिणाम मोठा असून महामंडळाला सुमारे १२४ कोटी रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भार सहन करावा लागणार आहे. एसटी महामंडळासाठी हा भार मोठा असल्याचे सरनाईक यांनी सांगितले.

जागतिक पातळीवर युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली किंवा इंधनदरात आणखी वाढ झाली, तर त्याचा परिणाम एसटी महामंडळावर अधिक तीव्र होऊ शकतो. त्यामुळे एसटीसाठी डिझेल दरात विशेष सवलत देण्याचा निर्णय झाला, तर प्रवाशांवर दरवाढीचा बोजा टाकला जाणार नाही, असे सरनाईक यांनी स्पष्ट केले. याबाबत कॅबिनेट बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र देणार असल्याचेही त्यांनी सांगितले. मे महिना संपेपर्यंत सरकारकडून निर्णयाची प्रतीक्षा केली जाणार आहे. याबाबत योग्य निर्णयाची प्रतिक्षा केली जाणार असून, त्यानंतरच निर्णय होईल.

### आणखी २५ रुपये दरवाढीची शक्यता

# पेट्रोल-डिझेल दरवाढीनंतरही तेल कंपन्यांचा तोटा कायम

■ दैनिक राज्य लोकतंत्र





**नवी दिल्ली** : गेल्या आठवड्यात पेट्रोल आणि डिझेलच्या दरात प्रति लिटर ३ रुपयांची वाढ करण्यात आली असली, तरी भारतीय तेल विपणन कंपन्यांचा तोटा अद्याप कमी झालेला नाही. तज्ज्ञांच्या मते, सध्याच्या कच्च्या तेलाच्या किमती आणि विक्रीदर यामध्ये मोठी तफावत असल्याने तेल कंपन्यांना पेट्रोल आणि डिझेलवर सरासरी प्रति लिटर २५ रुपयांचा तोटा सहन करावा लागत आहे. विश्लेषकांच्या अंदाजानुसार, इंडियन ऑइल कॉर्पोरेशन, भारत पेट्रोलियम आणि हिंदुस्तान पेट्रोलियम या सरकारी तेल विपणन कंपन्यांना दररोज सुमारे १,३८० कोटी रुपयांचा तोटा होत आहे. पेट्रोल आणि डिझेलबरोबरच एलपीजीचा समावेश केल्यास हा तोटा अधिक वाढत असल्याचे विश्लेषकांनी म्हटले आहे. अहवालानुसार, सध्याचा तोटा याच पातळीवर कायम राहिल्यास तेल कंपन्यांच्या आर्थिक स्थितीवर गंभीर परिणाम होऊ शकतो. इंडियन ऑइल कॉर्पोरेशन, भारत पेट्रोलियम आणि हिंदुस्तान पेट्रोलियम या कंपन्या अनुक्रमे १०, ४ आणि २ वर्षांच्या आत आपली संपूर्ण बॅलन्स शीट इक्विटी गमावू शकतात, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

या संकटाचा सर्वाधिक फटका हिंदुस्तान पेट्रोलियमला बसण्याची शक्यता आहे. कंपनीचे मोठे मार्केटिंग नेटवर्क असल्याने तिच्या एकात्मिक मार्जिनवर सर्वाधिक दबाव आला आहे. फर्मच्या अंदाजानुसार, हिंदुस्तान पेट्रोलियमला सध्या एकात्मिक आधारावर प्रति बॅरल १९ डॉलरचा तोटा सहन करावा लागत आहे. त्या तुलनेत इंडियन ऑइलला प्रति बॅरल ४ डॉलर, तर भारत पेट्रोलियमला प्रति बॅरल ८ डॉलरचा तोटा होत आहे. सध्याचे तेल संकट सुरू होण्यापूर्वी या तिन्ही कंपन्या प्रति बॅरल १२ ते १४ डॉलरचा नफा कमावत होत्या. मात्र, कच्च्या तेलाच्या वाढत्या किमती आणि किरकोळ इंधनदरांवरील मर्यादा यामुळे कंपन्यांच्या मार्जिनवर मोठा परिणाम झाला आहे.

एका अंदाजानुसार, प्रति लिटर ३ रुपयांच्या दरवाढीमुळे पेट्रोल आणि डिझेलवरील वार्षिक एकात्मिक तोटा सुमारे ३४,५०० कोटी रुपयांनी कमी होऊ शकतो. मात्र, कच्च्या तेलाच्या किमती कमी झाल्या नाहीत, तर किरकोळ इंधनदरांमध्ये आणखी वाढ करावी लागेल किंवा सरकारकडून अतिरिक्त आर्थिक मदतीची गरज निर्माण होऊ शकते. तज्ज्ञांच्या मते, सध्याची प्रति लिटर ३ रुपयांची दरवाढ ही केवळ सुरुवात असू शकते. तेल कंपन्यांना विपणन नफा मिळवण्यासाठी आणि खर्च भरून काढण्यासाठी प्रति लिटर आणखी २५ रुपयांची वाढ आवश्यक असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. मात्र, अशी वाढ टप्प्याटप्प्याने केली जाण्याची शक्यता अधिक आहे. त्यामुळे आगामी काळात इंधनदरवाढीचा दबाव सर्वसामान्य ग्राहकांवर वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# नीट पेपरफुटीप्रकरणी मनीषा मांढरे निलंबित

■ दैनिक राज्य लोकतंत्र





**पुणे** : नीट पेपरफुटीप्रकरणी अटकेत असलेल्या प्राध्यापिका मनीषा मांढरे यांच्यावर अखेर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. पुण्यातील मॉडर्न महाविद्यालयाच्या प्रशासनाने मनीषा मांढरे यांच्या निलंबनाचे आदेश जारी केले आहेत.

मनीषा मांढरे यांचा नीट पेपरफुटीप्रकरणात सहभाग असल्याचे समोर आल्यानंतर महाविद्यालय प्रशासनाने तातडीची बैठक बोलावली. या बैठकीत त्यांच्या निलंबनाबाबत चर्चा करण्यात आली. चर्चेनंतर प्रशासनाने त्यांना निलंबित करण्याचा निर्णय घेतला. मनीषा मांढरे या मॉडर्न महाविद्यालयात प्राणीशास्त्राच्या प्राध्यापिका म्हणून कार्यरत होत्या. नीट पेपरफुटीप्रकरणात त्यांचे नाव समोर आल्यानंतर महाविद्यालय प्रशासनावर कारवाईचा दबाव वाढला होता.

महाविद्यालयाने काढलेल्या पत्रात ही घटना शिक्षण क्षेत्राच्या प्रतिमेला बाधा पोहोचवणारी असल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे मनीषा मांढरे यांना निलंबित करण्यात येत असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. मनीषा मांढरे यांना सीबीआयने अटक केली असून त्यांची चौकशी सुरू आहे.

## संपादकीय

# कोंडी, कारस्थान आणि कूटनीती



**मध्यपूर्वेतील भयंकर युद्धज्वाळांनी होर्मुझची मोक्याची सामुद्रधुनी वेढलेली असताना, इराणने भारतासह मित्रराष्ट्रांना दिलेला सुरक्षित मार्ग हा केवळ तेल मुत्सद्देगिरीचा विजय नाही; तर रशियाचा सुप्त अजेंडा आणि भारतांतर्गत इंधनाच्या दरांचा भडका रोखण्यासाठी रचलेला हा एक अत्यंत गुंतागुंतीचा सामरिक डाव आहे.**

आंतरराष्ट्रीय राजकारणात जेव्हा जेव्हा तेलाचा विषय येतो, तेव्हा पडद्यावर दिसणाऱ्या पात्रांपेक्षा पडद्यामागचे सूत्रधार अधिक महत्त्वाचे असतात. होर्मुझच्या सामुद्रधुनीतील सध्याच्या थरारामागे केवळ अमेरिका, इस्रायल आणि इराण एवढीच त्रिसूत्री नाही; तर यात रशियाचा एक अत्यंत सुप्त आणि हुशारीने खेळला गेलेला 'कोन' आहे. युक्रेन संघर्षानंतर रशियावर लादलेल्या पाश्चात्त्य निर्यातीवरील निर्बंधांमुळे मॉस्कोला आपल्या इंधनासाठी नव्या बाजारपेठा शोधणे भाग होते, ज्यात भारताने रशियन 'उरल्स' क्रूड मोठ्या प्रमाणात खरेदी करून मस्कोला मोठा आर्थिक ऑक्सिजन दिला. आता जेव्हा आखातात युद्ध भडकले आहे आणि होर्मुझमधून तेलाची वाहतूक ठप्प होण्याची भीती निर्माण झाली आहे, तेव्हा जागतिक बाजारात कच्च्या तेलाचे दर प्रति बॅरल १०० डॉलर्सच्या पार जाणे रशियाच्या पथ्यावरच पडणारे आहे. तेलाचे दर जितके वाढतील, तितकी रशियाची युद्धखरेदी सोपी होईल. परंतु, रशियाला आपला सर्वात मोठा ग्राहक असलेल्या भारताला पूर्णपणे नाराजही करायचे नाही. म्हणूनच, इराणवर असलेल्या आपल्या प्रभावाचा वापर करून मस्कोने तेहरानला भारतासारख्या 'मित्र देशांना' सुरक्षित मार्ग देण्यास प्रवृत्त केले, हा या कूटनीतीचा छुपा भाग आहे. 'ब्रिक्स' आणि 'शांघाय सहकार्य संघटने'च्या व्यासपीठावर रशिया आणि इराणमधील वाढती जवळीक ही भारतासाठी एकाच वेळी फायद्याची आणि आव्हानात्मक ठरत आहे. भारताने इराणशी थेट बोलणी केली असली, तरी त्यामागे मॉस्कोची मूक संमती आणि सामरिक मध्यस्थी होती, हे उघड गुपित आहे. भारताची तब्बल ८५ टक्के तेलाची गरज आयातीवर अवलंबून आहे. होर्मुझची सामुद्रधुनी पूर्णपणे बंद झाली असती, तर देशांतर्गत बाजारात पेट्रोल आणि डिझेलच्या दरांनी प्रति लीटर १५० रुपयांचा आकडा सहज पार केला असता. गेल्या काही महिन्यांत देशातील सरकारी तेल कंपन्यांनी आंतरराष्ट्रीय बाजारातील कच्च्या तेलाच्या किमती वाढूनही देशांतर्गत दर स्थिर ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न केला. मात्र, हा तोटा या कंपन्या किती काळ सहन करणार? हा मूळ प्रश्न होता. इराणने भारतीय टँकर्सची कोंडी केली असती, तर देशात एलपीजी आणि डिझेलचा अभूर्व तुटवडा निर्माण झाला असता. संसदेत विरोधकांचा गदारोळ, महागाईवरून जनतेमध्ये वाढणारा असंतोष आणि आगामी राज्यांमधील निवडणुकांचे गणित लक्षात घेता, मोदी सरकारला कोणत्याही परिस्थितीत ही तेल कोंडी फोडणे गरजेचे होते. म्हणूनच, भारताने तेहरानशी थेट सौदा केला. हा निर्णय देशांतर्गत आर्थिक स्थैर्य आणि राजकीय अस्तित्व टिकवण्याचा 'डिफेन्सिव्ह' डाव होता. या संपूर्ण घडामोडींनी भारताला पुन्हा एकदा एका कठोर वास्तवाची जाणीव करून दिली आहे. पाश्चात्त्य देशांच्या सुरात सूर मिसळणे आपल्याला जागतिक महासत्ता बनवेल, असा एक समज निर्माण केला गेला होता. मात्र, जेव्हा प्रत्यक्ष संकट आले, तेव्हा अमेरिकेने स्वतःच्या हितासाठी इराणला चिथावले, पण त्यामुळे होणाऱ्या आर्थिक विनाशाची झळ आशियाई मित्रांना बसेल, याकडे साफ दुर्लक्ष केले. वॉशिंग्टनच्या या आत्मकेंद्री धोरणामुळे भारताची ऊर्जा सुरक्षा धोक्यात आली होती. अशा वेळी भारताला शेवटी आपल्या जुन्या आणि भौगोलिकदृष्ट्या जवळ असलेल्या इराण आणि रशियाच्या अक्षाकडेच जावे लागले. यावरून हेच सिद्ध होते की, भारतासारख्या खंडप्राय देशाला कोणत्याही एका पाश्चात्त्य महासत्तेच्या दावणीला बांधून चालणार नाही. आपली धोरणात्मक स्वायत्तता टिकवून ठेवणे ही चैन नसून ती आपली मूलभूत गरज आहे, हे भारताने पुन्हा एकदा दाखवून दिले. इराणने भारताला 'मित्र' म्हणून दिलेली मान्यता आणि रशियाने पडद्यामागून दिलेली साथ ही भारताच्या वाढत्या जागतिक वजनाचा स्वीकार आहे. वॉशिंग्टनच्या दबावाला झुगारून, मॉस्कोचा कोन सांभाळत आणि तेहरानशी थेट संवाद साधून स्वतःचा तेल मार्ग सुरक्षित ठेवण्यात भारताला मिळालेले हे यश निश्चितच कौतुकास्पद आहे. मात्र, तेलाच्या प्रत्येक थेंबासाठी आपल्याला दुसऱ्याच्या दारी जावे लागते आणि देशांतर्गत पेट्रोलचे दर आखातातील वादळांवर अवलंबून असतात, हे कच्चे वास्तव जोपर्यंत बदलत नाही, तोपर्यंत अशा तात्कालिक कूटनीतिक विजयांवर अधिक काळ विसंबून चालणार नाही, हेच या संकटाचे खरे मर्म आहे!

# अमेरिकेचा धोरणात्मक दिखावा आणि चिनी वास्तव

**» बीजिंगमध्ये नुकत्याच पार पडलेल्या ट्रम्प आणि शी जिनपिंग यांच्या शिखर परिषदेतून अमेरिकेने आणि चीनने आपले तात्कालिक राजकीय हेतू साध्य केले. मात्र, या कूटनीतिक पटावर खरा वरचष्मा चीनचाच राहिला.**

कोणत्याही आंतरराष्ट्रीय दौऱ्यात किंवा शिखर परिषदेत ठोस धोरणात्मक आणि दूरगामी निर्णयांपेक्षा 'इव्हेंट मॅनेजमेंट' आणि भपकेबाजपणावर अधिक भर देण्याची अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची जुनीच खोड आहे. नुकत्याच पार पडलेल्या त्यांच्या बीजिंग दौऱ्यात आणि चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांच्यासोबतच्या शिखर परिषदेत या वस्तुस्थितीचा प्रत्यय जगाला पुन्हा एकदा आला. आंतरराष्ट्रीय राजकारणात 'दिखावा' हाच जेव्हा वास्तवाचा मुखवटा बनतो, तेव्हा मूळ आणि गंभीर प्रश्न कसे जाणीवपूर्वक बाजूला सारले जातात, याचे हे एक उत्तम उदाहरण. इराणसोबतच्या वाढत्या संघर्षाची शक्यता आणि त्यातून अमेरिकेच्या देशांतर्गत राजकारणात व अर्थकारणात निर्माण झालेली वादळे यावरून जनतेचे लक्ष विचलित करण्यासाठी ट्रम्प यांना परराष्ट्र धोरणाच्या आघाडीवर एका मोठ्या 'विजयाची' नितांत आवश्यकता होती. दुसरीकडे, अमेरिकेने गेल्या काही काळात



लादलेल्या व्यापारयुद्धाच्या (टॅरिफ) संकटातून आपला देश केवळ सावरलाच नाही, तर आज तो जागतिक महासत्ता म्हणून अमेरिकेच्या बरोबरीने उभा आहे, हे चीनला आणि पर्यायाने शी जिनपिंग यांना आपल्या देशातील जनतेला व जगाला दाखवून द्यायचे होते. या दोघांच्याही या आत्मकेंद्री आणि तात्कालिक गरजा या बीजिंग परिषदेने पूर्ण केल्या. म्हणूनच ट्रम्प यांनी या भेटीला 'अत्यंत यशस्वी' ठरवले, तर जिनपिंग यांनी तिला 'ऐतिहासिक' म्हटले. परंतु, या परस्परांचे पाठीराखे बनण्याच्या खेळात, चीनने अमेरिकेच्या तुलनेत आपल्या पदरात थोडे अधिकच पाडून घेतले, हा या दौऱ्याचा खरा अन्वयार्थ आहे.

या दौऱ्याची फलनिष्पत्ती काय, हे सांगणाऱ्या दोन्ही देशांच्या अधिकृत निवेदनांमधील तफावत पाहिली, तर अनेक गोष्टींचा उलगडा होतो. व्हाईट हाऊसच्या निवेदनात बोईंग विमानांची खरेदी, शेतमालाची आयात, अमेरिकन कंपन्यांना चिनी बाजारपेठेत प्रवेश अशा केवळ व्यावसायिक बाबींवर भर दिला गेला. मात्र, चीनच्या अधिकृत निवेदनात यातील कोणत्याही तपशिलाचा साधा उल्लेखही नव्हता. चीनने आपली अर्थव्यवस्था, औद्योगिक क्षमता आणि इतर संरचनात्मक मुद्द्यांवर कोणतीही तडजोड न करता स्वतःची धोरणात्मक स्वायत्तता अबाधित ठेवली.

या परिषदेतील सर्वात धक्कादायक आणि चिंतेची बाब म्हणजे तैवानचा मुद्दा. शी जिनपिंग यांनी अत्यंत आक्रमकपणे आणि जाणीवपूर्वक तैवानच्या मुद्द्यावर जगासमोर थेट इशारा दिला की, जर हा प्रश्न चुकीच्या पद्धतीने हाताळला गेला, तर दोन्ही देशांमध्ये संघर्ष आणि थेट युद्धही भडकू शकते. अमेरिकेच्या निवेदनात मात्र तैवानचा उल्लेखही नव्हता. उलट, ट्रम्प यांनी मायदेशी परतताना तैवानला दिल्या जाणाऱ्या १४ अब्ज डॉलर्सच्या शस्त्रास्त्र करारावर 'कोणतीही हमी देता येणार नाही' असे सांगून टाकले. रोनाल्ड रेगन यांच्या काळापासून अमेरिकेने तैवानला दिलेल्या संरक्षणाच्या 'सहा हमी' ट्रम्प यांनी वाऱ्यावर सोडून दिल्या.

तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि 'रेअर अर्थ' खनिजे या भविष्यातील युद्धाच्या खऱ्या आघाड्या आहेत. एकीकडे अमेरिकेने एनव्हिडिया कंपनीच्या लाखो चिप्सच्या निर्यातीला परवानगी दिली असताना, चीनने मात्र त्याला जाणीवपूर्वक स्थगिती दिली आहे. हे चीनचे स्वदेशीकरणाचे धोरण आहे. याशिवाय, 'रेअर अर्थ' खनिजांच्या पुरवठ्याबाबत चीनने जी कोंडी केली होती, ज्यामुळे अमेरिकेला आधीच्या टॅरिफ युद्धात माघार घ्यावी लागली, त्याचा उल्लेख दोन्ही बाजूंकडून टाळला गेला.

या सर्व घडामोडींचा आणि बदलत्या समीकरणांचा भारताच्या दृष्टिकोनातून विचार करणे अत्यंत गरजेचे आहे. जेव्हा जगातील दोन सर्वोच्च महासत्ता आपापसांत तडजोडी करतात, तेव्हा इतर देशांच्या राजनयिक स्वातंत्र्याला आणि सामरिक हालचालींना मर्यादा येतात. अमेरिकेच्या आधारावर आपण चीनच्या अरेरावीला रोखू शकतो, हा भारताचा भ्रम यातून आता दूर व्हायला हवा. अमेरिकेच्या प्राधान्यक्रमात भारताचे सामरिक महत्त्व जर कमी होत आहे, हे बीजिंगने ओळखले, तर सीमाप्रश्नावर किंवा इतर द्विपक्षीय वादांमध्ये चीन भारताला भविष्यात कोणतीही सवलत देणार नाही, हे उघड आहे.

ट्रम्प आणि शी जिनपिंग यांची ही भेट म्हणजे रणनीतिक समेट नसून, निव्वळ सोयीची तडजोड आहे. यात अमेरिकेने धोरणात्मक उथळपणा पुन्हा एकदा जगासमोर मांडला, तर चीनने अमेरिकेकडून महासत्ता असल्याचा ठसा अधिकृतपणे उमटवून घेतला. कूटनीतीच्या या गुंतागुंतीच्या पटावर ट्रम्प यांनी केवळ दिखावा करत हसतमुख फोटो काढले, तर जिनपिंग यांनी शांतपणे बाजी मारली, हाच या शिखर परिषदेचा खरा अन्वयार्थ!

# ‘हरित व आत्मनिर्भर शहर’ अभियान

## महापौर रवि लांडगे यांचा पुढाकार

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ऊर्जा बचत, पर्यावरण संवर्धन आणि स्वदेशी उत्पादनांच्या वापराबाबतच्या आवाहनाला तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशांना प्रतिसाद देत पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत “हरित, ऊर्जा सक्षम आणि आत्मनिर्भर पिंपरी-चिंचवड” अभियान राबविण्याचा निर्णय महापौर रवि लांडगे यांनी घेतला आहे.



यासंदर्भात महापौरांनी महापालिका आयुक्तांना पत्राद्वारे सूचना देत प्रशासन, अधिकारी-कर्मचारी, नागरिक, शाळा, गृहनिर्माण संस्था, उद्योग आणि सामाजिक संघटनांच्या सहभागातून व्यापक स्तरावर विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्याचे निर्देश दिले आहेत. या अभियानामुळे शहरात ऊर्जा बचत, इंधन बचत, पर्यावरण संरक्षण, स्वदेशी उत्पादनांना चालना आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढण्यास मदत होणार आहे. तसेच प्रशासनाच्या दैनंदिन कामकाजात पर्यावरणपूरक आणि खर्च बचतीच्या उपाययोजनांवर भर दिला जाणार आहे.

या उपक्रमांतर्गत “हरित पिंपरी-चिंचवड आठवडा”, “नो पॉवर अवर”, “एक कर्मचारी – एक वृक्ष”, ई-वाहन व चार्जिंग स्टेशन प्रोत्साहन, “वर्क फ्रॉम होम / व्हर्च्युअल मीटिंग” धोरण, “स्वदेशी बाजार – आत्मनिर्भर पीसीएमसी”, पेपरलेस प्रशासन, “ऑईल फ्री हेल्दी कॅन्टीन”, “सौर पिंपरी-चिंचवड” अभियान, “ग्रीन रेटिंग” स्पर्धा, “सायकल टू वर्क डे”, नैसर्गिक शेती व टेरेस गार्डन प्रोत्साहन तसेच “हरित गणेशोत्सव / हरित उत्सव” यांसारखे विविध उपक्रम राबविले जाणार आहेत. महापौर रवि लांडगे म्हणाले, “ऊर्जा बचत, पर्यावरण संवर्धन आणि स्वदेशीचा संदेश हा केवळ शासनाचा कार्यक्रम नसून जनआंदोलन व्हावे, हा आमचा प्रयत्न आहे. विकासासोबत पर्यावरण संरक्षणातही पिंपरी-चिंचवड शहर राज्यात आदर्श निर्माण करेल.”

# अनधिकृत होर्डिंग्जवर धडक कारवाई

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहरातील चौकाचौकांत अनधिकृत किऑक्स, होर्डिंग्ज, फ्लेक्स आणि बॅनरमुळे होत असलेल्या विद्रुपीकरणाविरोधात महापालिकेच्या आकाशचिन्ह व परवाना विभागाने धडक कारवाई सुरू केली आहे. एका दिवसाच्या कारवाईत एक लाख रुपयांचा दंड वसूल करण्यात आला असून संबंधितांविरोधात फौजदारी गुन्हेही दाखल करण्यात आले आहेत.

शहरातील झाडे, महावितरणचे विद्युत खांब, सार्वजनिक ठिकाणे तसेच विनापरवाना उभारण्यात आलेल्या कमानींवर जाहिराती लावून विद्रुपीकरण केले जात असल्याच्या तक्रारी वाढल्या होत्या. वाढदिवस, स्वागत समारंभ, उद्घाटन यांसारख्या कार्यक्रमांच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणावर फ्लेक्स आणि बॅनर लावले जात असल्याने महापालिकेने कारवाईचा बडगा उगारला आहे. महापालिकेने नागरिकांना अनधिकृत होर्डिंग्ज, फ्लेक्स, किऑक्स आणि जाहिरात फलक न लावण्याच्या सूचना दिल्या असून त्यानंतर अतिक्रमणविरोधी मोहीम अधिक तीव्र करण्यात आली आहे.

आकाशचिन्ह व परवाना विभागाच्या अतिक्रमण पथकाने शुक्रवारी (दि.१५) केलेल्या कारवाईत दोन जणांवर दंडात्मक कारवाई करत एक लाख रुपयांचा दंड वसूल केला. या कारवाईदरम्यान ५६ झेंडे, २७ लाकडी बॅनर, ७ लोखंडी फ्रेम आणि १२० किऑक्स जप्त करण्यात आले.

# भाजी मंडईत फळभाज्यांचे दर स्थिर

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी** : पिंपरी येथील लालबहादूर शास्त्री भाजी मंडईत रविवारी गेल्या आठवड्याच्या तुलनेत फळभाज्यांचे दर स्थिर राहिले. मात्र बिन्स आणि वाटाण्याच्या आवकेत घट झाल्याने त्यांच्या दरात वाढ झाली आहे.

बाजारात पालेभाज्यांच्या दरात किरकोळ घट दिसून आली. कोथिंबीर आणि मेथीच्या जुडीला ३० रुपये दर होता. गवार आणि शेवगा ५० ते ६० रुपये किलो दराने विक्रीस होते. वांगी आणि फ्लॉवरला ४० ते ५० रुपये किलो दर मिळत होता. मिरची ५० रुपये किलो, तर कर्नाटक कैरी ५० ते ६० रुपये किलो दराने उपलब्ध होती. कांदे पाच किलोसाठी १०० रुपये दराने विकले जात होते. लसूण १०० ते १५० रुपये, तर आले ८० ते ९० रुपये किलो दराने उपलब्ध होते.

गवार ७० रुपये, शेवगा ६०, टोमॅटो २५, भेंडी ६०, फ्लॉवर ३०, कोबी २५, मिरची ५०, गाजर २५, शिमला मिरची ६०, लसूण १०० ते १२०, आले ७०, वांगी ४०, काकडी ४०, कारले ७०, कांदे २० ते २५, बटाटा २५ ते ३०, बिन्स १६०, पावटा ८०, लाल भोपळा ३०, घोसाळी ६०, दोडका ७०, तोंडली ७०, बीट ५०, दुधी ४० आणि घेवडा ६० रुपये किलो दराने विक्रीस होते. कोथिंबीर ३० रुपये, मेथी ३०, पालक ३०, शेपू २५, राजगिरा २५, पुदिना १०, मुळा ३०, चवळई २०, लाल माठ १५, कांदापात ३०, करडई १५, आळू पाने १५ दराने विक्रीस होता.

शेवगा ८० रुपये, गवार ६० ते ८०, वाटाणा १२० ते १५०, पावटा ९०, तोंडली ८०, बीट ५० ते ६०, दोडका ६० ते ८०, कारले ८० दराने विक्रीस होती.

# ‘स्व’चा शोध घडवणारी ‘अंतर्नाद’ची वारी

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी** : “आजच्या युगात प्रत्येक माणूस हरवलेला आहे. स्वतःमधील विठ्ठल शोधण्यासाठी ‘अंतर्नाद’ पाहणे आवश्यक आहे. या संगीत नाटकातून साक्षात विठ्ठल दर्शनाची अनुभूती मिळते,” असे प्रतिपादन पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त विजय सूर्यवंशी यांनी केले.



‘अंतर्नाद’ या भव्य संगीत नाटकाचा शुभारंभ प्रयोग शनिवारी (दि.१६) चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात उत्साहात पार पडला. या वेळी आळंदी ज्ञानेश्वर संस्थान समितीचे अध्यक्ष भावार्थ देखणे, अखिल भारतीय नाट्य परिषद पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष तथा मोरया थिएटरचे संस्थापक आणि ‘अंतर्नाद’चे निर्माते भाऊसाहेब भोईर उपस्थित होते.

आयुक्त विजय सूर्यवंशी म्हणाले, “‘अंतर्नाद’मधील प्रत्येक कलाकार भक्तीरसाने ओथंबलेला आहे. वारीला प्रत्यक्ष न जाताही वारीचा अनुभव देण्याची ताकद या नाटकात आहे. विशेष म्हणजे, या प्रयोगातील एकही गीत कॉपी नसून सर्व गीते खास या नाटकासाठी लिहिण्यात आली आहेत. त्यामुळे हा प्रयोग संस्मरणीय ठरला आहे.”

ज्ञानेश्वर संस्थान समितीचे अध्यक्ष भावार्थ देखणे यांनीही नाटकाचे कौतुक करताना सांगितले की, “ज्ञान, ध्यान आणि समाधान म्हणजेच पंढरपूरची वारी. ‘अंतर्नाद’ पाहताना प्रत्येक प्रेक्षक भारावून जातो. अडीच तासांच्या या प्रवासानंतर मिळणारे समाधान अवर्णनीय आहे. कलाकारांनी प्रत्यक्ष भगवंताची अनुभूती घडवत प्रेक्षकांनाही भक्तिरंगात रंगवले.”

या नाटकाचा पुढील प्रयोग शुक्रवार (दि.२२ मे) रोजी हडपसर येथील विठ्ठलराव तुपे नाट्यगृहात होणार आहे. दिग्दर्शक मनोज डाळिंबकर यांनी सांगितले की, कलाकार प्रणव सपकाळे, मनोज डाळिंबकर, निरंजन पेडगावकर, अंकिता शिवतरे, राजू बंग यांच्यासह सर्व कलाकारांनी उत्कृष्ट कामगिरी करत पहिलाच प्रयोग यशस्वी केला. पोवाडा, पिंगळा, वासुदेव, लावणी, जात्यावरची गाणी, भूपाळी आणि रॅप साँगचा संगम असलेल्या या संगीत नाटकाचे लेखन विनोद रत्ना यांनी केले आहे. संकल्पना व दिग्दर्शन मनोज डाळिंबकर, संगीत निरंजन पेडगावकर, तर गीते मुराद तांबोळी यांनी लिहिली आहेत.

# रावेतमध्ये दोन कोटींच्या खंडणीसाठी फायरिंग

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी :** रावेत परिसरात दोन कोटी रुपयांच्या खंडणीसाठी फर्निचर व्यावसायिकावर गोळीबार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी रावेत पोलिस ठाण्यात अज्ञात आरोपींविरुद्ध खुनाचा प्रयत्न, खंडणी आणि शस्त्रास्त्र कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही घटना शुक्रवारी (दि.१५ मे) रात्री सुमारे ९.१० वाजण्याच्या सुमारास पुणावळे-रावेत बीआरटी रोडवरील बी.जे. फर्निचर मॉलसमोर घडली. याप्रकरणी जगदीश भेराराम बिष्णोई (वय ३४) यांनी फिर्याद दिली आहे.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांचे भागीदार अशोककुमार बिष्णोई यांना परदेशी क्रमांकावरून व्हॉट्सअॅप कॉल आला होता. कॉल करणाऱ्याने दोन कोटी रुपयांची खंडणी मागत पैसे न दिल्यास जीवे मारण्याची धमकी दिली होती. मात्र, संबंधितांनी या धमकीकडे दुर्लक्ष केले.

त्यानंतर शुक्रवारी रात्री दोन अज्ञात इसम मोटारसायकलवरून बी.जे. फर्निचर मॉलसमोर आले. त्यांनी पिस्तुलातून फिर्यादीच्या दिशेने पाच ते सहा राऊंड गोळीबार केला. सुदैवाने या घटनेत कोणीही जखमी झाले नाही. गोळीबार केल्यानंतर आरोपी घटनास्थळावरून पसार झाले.

या प्रकरणी भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत खुनाचा प्रयत्न, खंडणी, गुन्हेगारी कट तसेच शस्त्रास्त्र कायद्याच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस आरोपींचा शोध घेत आहेत.

### तरुणाचा अपघाती मृत्यू

**पुणे :** भरधाव वेगातील स्विफ्ट डिजायर कारवरील ताबा सुटून झालेल्या भीषण अपघातात मोशीतील एका तरुणाचा मृत्यू झाला असून एक जण गंभीर जखमी झाला आहे.

ही घटना गुरुवारी (दि. १४ मे) मध्यरात्री एकच्या सुमारास पुणे-नाशिक महामार्गावर भोसरी पोलीस ठाण्याजवळ घडली. याप्रकरणी भोसरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, आयुष विजय बनकर (वय २२, रा. बनकरवस्ती, मोशी) हा त्याच्या ताब्यातील स्विफ्ट डिजायर कार (एमएच १४ डीटी ०७९५) भरधाव वेगाने चालवत होता. यावेळी अचानक रस्त्यात कुत्रा आडवा आल्याने चालकाचा वाहनावरील ताबा सुटला. त्यानंतर कार रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडावर जोरात आदळून पलटी झाली.

या भीषण अपघातात कारमधील आशीष बाळासाहेब मुळीक (वय २२, रा. गंधर्वनगरी, वृंदावन कॉलनी, मोशी) हा गंभीर जखमी झाला. तर चालक आयुष बनकर याचा गंभीर दुखापतींमुळे मृत्यू झाला.

याप्रकरणी अभिषेक बाळासाहेब मुळीक (वय २५) यांनी फिर्याद दिली आहे. भोसरी पोलीसांनी भारतीय न्याय संहिता कलम १०६(१), २८१, १२५ (अ), १२५ (ब) तसेच मोटार वाहन कायद्यानुसार गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मांजरे करीत आहेत.

### घरफोडीत १५ लाखांचा ऐवज लंपास

**पिंपरी**

रावेत गावठाण परिसरातील स्वामी समर्थ सोसायटीतील फ्लॅटमध्ये घरफोडी करून अज्ञात चोरट्याने सोन्या-चांदीचे दागिने आणि रोकड असा सुमारे १५ लाख २८ हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी रावेत पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना १५ मे २०२६ रोजी सकाळी १०.४५ ते दुपारी १२.३० वाजण्याच्या दरम्यान बाबा बिल्डिंग, फ्लॅट क्रमांक २०१, स्वामी समर्थ सोसायटीजवळ, रावेत गावठाण येथे घडली.

याप्रकरणी मनोज अशोक भोंडवे (वय २५) यांनी फिर्याद दिली आहे. अज्ञात आरोपीने घराचा कोयंडा तोडून फ्लॅटमध्ये प्रवेश केला. त्यानंतर घरातील १७८ ग्रॅम सोन्याचे दागिने, ७५ ग्रॅम चांदीचे दागिने तसेच १ लाख ४५ हजार रुपयांची रोकड असा एकूण १५ लाख २८ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक खिळे करीत आहेत.

# मॉर्निंग वॉकदरम्यान कारची धडक

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पुणे :** बाणेर परिसरात मॉर्निंग वॉकसाठी गेलेल्या एका व्यक्तीचा भरधाव अज्ञात चारचाकी वाहनाच्या धडकेत मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी (दि. १६ मे) सकाळी घडली. याप्रकरणी बावधन पोलीस ठाण्यात अज्ञात वाहन चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कुणाल विश्वासराव मोहिते (वय ३८) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. ते शुक्रवारी सकाळी सुमारे ७.१० वाजण्याच्या सुमारास बाणेर येथील पाण्याच्या टाकीजवळ, प्लॅटिनम बिल्डिंगसमोर मॉर्निंग वॉक करत होते. यावेळी एका अज्ञात चारचाकी वाहन चालकाने वाहतुकीचे नियम धाब्यावर बसवत भरधाव आणि निष्काळजीपणे वाहन चालवत मोहिते यांना जोरदार धडक दिली. या अपघातात मोहिते गंभीर जखमी झाले. अपघातानंतर वाहन चालकाने जखमींना कोणतीही मदत न करता तसेच घटनास्थळी न थांबता वाहनासह पलायन केले. गंभीर जखमी अवस्थेत असलेल्या मोहिते यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. याप्रकरणी अभिषेक राजेंद्र धुमाळ (वय ३३, रा. कोथरूड, पुणे) यांनी फिर्याद दिली आहे. बावधन पोलिसांनी संबंधित कलमांनुसार अज्ञात वाहन चालकाविरोधात गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक ठाकरे करत आहेत.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### अ‍ॅड. विलास काळे यांचे निधन



**राजगुरुनगर** : खेड-आळंदी मतदारसंघाचे आमदार बाबाजी काळे यांचे बंधू अ‍ॅड. विलास रामचंद्र काळे (वय ६१) यांचे रविवारी (दि. १७) हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. त्यांच्या पश्चात आमदार बाबाजी काळे यांच्यासह चार भाऊ, सात बहिणी, पत्नी, मयुर आणि आदित्य ही दोन मुले, एक मुलगी, पुतणे, सुना आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे.

### सोलापूर महामार्गावर भीषण अपघात

**उरुळी कांचन** : पुणे-सोलापूर महामार्गावर भरधाव वाहनांच्या बेफाम वेगामुळे आणखी एक अपघात घडला आहे. भांडगाव परिसरात अज्ञात वाहनाने दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने पती-पत्नी आणि त्यांचा नऊ वर्षीय मुलगा गंभीर जखमी झाले. अपघातानंतर वाहनचालक घटनास्थळावरून पसार झाल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सोनाली अनिल शेलार (वय २६), त्यांचे पती अनिल लक्ष्मण शेलार आणि मुलगा श्रेयश (वय ९) हे शनिवारी पहाटे उरुळी कांचन येथून जामखेडकडे निघाले होते. दुचाकीवरून प्रवास करत असताना सकाळी भांडगाव येथे मागून भरधाव वेगाने आलेल्या अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की दुचाकीवरील तिघेही रस्त्यावर फेकले गेले. यात सोनाली शेलार यांच्या डोक्याला, तोंडाला आणि पायाला दुखापत झाली असून अनिल शेलार यांच्या डोक्याला तसेच हात-पायांना गंभीर मार लागला आहे. तर लहानगा श्रेयशलाही हात-पायांना गंभीर दुखापत झाली आहे.

## महागाई, बिबट्यांची भीती आणि अपुरी मजुरी

# रणरणत्या उन्हात महिलांची कसरत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव** : आंबेगाव तालुक्यात कडक उन्हाचा तडाखा दिवसेंदिवस वाढत असतानाही शेतातील कामे सुरूच आहेत. पहाटेपासून संध्याकाळपर्यंत शेतात राबणाऱ्या शेतमजूर महिलांना प्रचंड उष्णता, वाढती महागाई, अपुरी मजुरी आणि बिबट्यांच्या भीतीचा सामना करत काम करावे लागत आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील कष्टकरी महिलांचे जीवन अधिकच कठीण बनले आहे.

सध्या स्वयंपाकासाठी गॅस सहज उपलब्ध होत नसल्याने अनेक कुटुंबांना चुलीवर स्वयंपाक करावा लागत आहे. पेट्रोल, डिझेल, खाद्यतेल, खतांसह दैनंदिन गरजेच्या वस्तूंच्या वाढत्या किमतींमुळे मिळणाऱ्या मजुरीत घरखर्च भागवणे कठीण झाले असल्याची खंत महिलांनी व्यक्त केली. दिवसभर उन्हात राबूनही केवळ ३०० रुपयांची मजुरी मिळत असल्याने




संसाराचा गाडा चालवताना मोठी कसरत करावी लागत असल्याचे त्यांनी सांगितले.

यंदाचा उन्हाळा अत्यंत तीव्र असल्याचे महिलांचे म्हणणे आहे. दुपारच्या कडक उन्हात अंगाची लाही लाही होत असतानाही पोटाची खळगी भरण्यासाठी शेतात उतरावे लागत आहे. उन्हापासून बचाव करण्यासाठी महिला डोक्यावर छत्र्या, स्कार्फ, टोपी तसेच पूर्ण अंग झाकणारे कपडे वापरताना दिसत आहेत. तरीही उष्माघाताचा धोका कायम आहे. नुकतीच आमोंडी गावात एका महिलेचा उष्माघाताने मृत्यू झाल्याची घटना घडल्याने महिलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

दरम्यान, तालुक्यातील अनेक भागांत बिबट्यांचा वावर वाढल्याने शेतात काम करताना महिलांना सतत धास्ती वाटत आहे. विशेषतः ऊस, मका आणि दाट पिकांच्या शेतात काम करताना जीव मुठीत धरून काम करावे लागत असल्याची भावना महिलांनी व्यक्त केली. सकाळी लवकर आणि सायंकाळी उशिरा काम करताना बिबट्यांच्या हालचालींची भीती अधिक जाणवत असल्याचेही त्यांनी सांगितले.

महागाई, कमी मजुरी, वाढते तापमान आणि वन्यप्राण्यांची भीती या चौफेर संकटात शेतमजूर महिला सापडल्या असून शासनाने तातडीने लक्ष देण्याची मागणी होत आहे. शेतमजूर महिलांसाठी विशेष आरोग्य सुविधा, उन्हाळी संरक्षण साहित्य, वाढीव मजुरी तसेच अत्यावश्यक वस्तूंवरील दर नियंत्रणासाठी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी महिलांकडून करण्यात येत आहे.

"दिवसभर उन्हात राबूनही हातात काहीच राहत नाही. घर चालवायचे कसे आणि मुलांचे शिक्षण करायचे कसे, हा मोठा प्रश्न आहे," अशी व्यथा अनेक महिला मजुरांनी व्यक्त केली.

## उत्तरेश्वर मंदिर रस्त्याच्या संरक्षण भिंतीच्या कामाचा शुभारंभ



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जुन्नर** : जुन्नर शहरातील प्राचीन उत्तरेश्वर मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याच्या संरक्षण भिंतीच्या कामाचा शुभारंभ शनिवारी नगराध्यक्षा सुजाता मधुकर काजळे यांच्या हस्ते करण्यात आला. या कामामुळे मंदिर परिसरातील रस्त्याची सुरक्षितता वाढण्यास मदत होणार असून पावसाळ्यात होणारा संभाव्य धोका टाळण्यासही मदत होणार आहे.

या कार्यक्रमाला नगर परिषदेचे मुख्याधिकारी चरण कोल्हे, बांधकाम विभाग प्रमुख राऊत, नगरसेवक आकीफ इनामदार, जनसेवक मधुकर काजळे, उत्तरेश्वर मंदिराचे पदाधिकारी, विश्वस्त तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी नगराध्यक्षा सुजाता काजळे यांनी संबंधित ठेकेदारांना पावसाळ्यापूर्वी काम तातडीने आणि गुणवत्तापूर्वक पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. मंदिर परिसरातील विकासकामांना प्राधान्य देण्यात येत असून नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक सुविधा उभारण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

उत्तरेश्वर मंदिर परिसर हा जुन्नर शहरातील ऐतिहासिक आणि धार्मिक दृष्ट्या महत्त्वाचा भाग मानला जातो. त्यामुळे संरक्षण भिंतीच्या या कामामुळे भाविक आणि नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## गोरक्षनाथ टेकडीवर भाविकांची गर्दी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**अवसरी** : आंबेगाव तालुक्यातील शेवाळवाडी व आदर्शगाव तांबडेमळा ग्रामपंचायतीच्या हद्दीवरील अवसरी फाटा येथील श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडीवर शनिवारी (दि. १६) शनि जयंती आणि शनि अमावस्या असा तब्बल १३ वर्षांनी दुर्मिळ योग आल्याने भाविकांनी मोठी गर्दी केली होती. पहाटेपासूनच दर्शन आणि अभिषेकासाठी रांगा लागल्या होत्या. संपूर्ण परिसराला यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते.

दूरदूरच्या भागातून आलेल्या भाविकांनी गोरक्षनाथ मंदिरात दर्शन घेत अभिषेक केला. यावेळी शरद बँकेचे अध्यक्ष देवेंद्रशेठ शहा, भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष बाळासाहेब बेंडे, सुरेश भोर, मिलिंद खुडे, ऋषिकेश गावडे, पुजन शहा, संजय मिश्रा, गौरव भोर आदी मान्यवरांच्या हस्ते प्रथम मानाचा अभिषेक पार पडला. त्यानंतर योगी खेतानाथजी बाबा ट्रस्टचे अध्यक्ष महंत योगी कृष्णनाथ महाराज, मिर्चीनाथ



महाराज, तुफाननाथ महाराज आणि अमरनाथ महाराज यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. महेश काका चिंचोलीकर आणि सोमन काका यांनी पौराहित्य केले.

पंचायत समिती सदस्य निलेश टेमकर, उद्योजक अशोकराव बाजारे, निरगुडसर येथील महात्मा गांधी तंटामुक्त समितीचे अध्यक्ष सुरे टाव्हरे आदींनीही शनि देवाचे दर्शन घेतले. मंदिर परिसरात मिठाई, पूजेचे साहित्य आणि प्रसादाच्या दुकानांची रेलचेल पाहायला मिळाली. भाविकांसाठी अन्नप्रसाद तसेच थंड पिण्याच्या पाण्याची विशेष व्यवस्था करण्यात आली होती.

पर्यावरण संवर्धन आणि इंधन बचतीचा संदेश देण्यासाठी इलेक्ट्रिक स्कूटींचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. तसेच आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर वृक्षलागवड आणि संवर्धनाबाबत स्वयंसेवकांनी जनजागृती केली. कार्यक्रमाच्या नियोजनासाठी नामदेव गावडे, बापूसाहेब निघोट, शीतल निघोट, अनुपम भोर यांच्यासह शनेश्वर मित्र मंडळाच्या कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# वाढत्या भारनियमनाने टाकळी अंधारात


## बिबट्याच्या भीतीने नागरिक त्रस्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**रांजणगाव गणपती** : शिरूर तालुक्यातील टाकळी हाजी परिसरात गेल्या दोन महिन्यांपासून सुरू असलेल्या विजेच्या भारनियमनामुळे ग्रामस्थांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. सायंकाळी वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले असून तातडीने नियमित वीजपुरवठा सुरू करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

परिसरात आधीच बिबट्याचा वाढता वावर असल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण आहे. त्यातच दररोज सायंकाळी ६ ते रात्री १० या वेळेत वीजपुरवठा बंद राहत असल्याने संपूर्ण गाव अंधारात बुडत आहे. त्यामुळे नागरिकांना घराबाहेर पडायलाही भीती वाटत आहे.

गावालगतच्या शेत परिसरात, ऊसाच्या फडात आणि मोकळ्या



जागांमध्ये बिबट्याच्या हालचाली दिसत असल्याने शेतकरी आणि पशुपालक रात्रभर जागून जनावरांची राखण करत आहेत. अशा परिस्थितीत अंधारामुळे सुरक्षेचा प्रश्न अधिक गंभीर बनला आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, पूर्वी क्वचितच वीज खंडित होत होती; मात्र गेल्या दोन महिन्यांपासून दररोजच अंधाराचा सामना करावा लागत आहे. "लहान मुलांना बाहेर सोडायलाही भीती वाटते. रात्री कुत्री भुंकली किंवा जनावरे अस्वस्थ झाली की काळजाचा ठोका चुकतो. बिबट्या कधी कुठून येईल सांगता येत नाही," अशी भावना नागरिकांनी व्यक्त केली.

महिलांनाही मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. सायंकाळी स्वयंपाक, पाणी भरणे आणि घरातील इतर कामे अंधारात करावी लागत आहेत. अनेक घरांमध्ये लहान मुले आणि वृद्ध व्यक्ती असल्याने रात्रीची वीज कपात अधिक त्रासदायक ठरत आहे. उकाड्यामुळे घरात बसणे कठीण होत असताना पंखे बंद राहत असल्याने नागरिक हैराण झाले आहेत. शेतकऱ्यांचेही मोठे नुकसान होत आहे. उन्हाळ्यात पिकांना पाणी देण्यासाठी रात्रीची वेळ महत्त्वाची असते. मात्र वीज नसल्याने मोटारी सुरू करता येत नसल्याने सिंचनाचे नियोजन विस्कळीत होत आहे. जनावरांच्या पाण्याचाही प्रश्न गंभीर बनला आहे. काही दिवसांपूर्वी गावालगतच्या भागात बिबट्याचे दर्शन झाल्याच्या घटनांमुळे ग्रामस्थ अधिक सतर्क झाले आहेत. "अंधारात एखादी दुर्घटना घडली किंवा बिबट्याने हल्ला केला तर जबाबदार कोण?" असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

महावितरणकडे वारंवार मागणी करूनही परिस्थितीत सुधारणा होत नसल्याची खंत ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. रात्रीचे भारनियमन तातडीने बंद करून नियमित वीजपुरवठा सुरू करावा, तसेच वनविभागाने परिसरात रात्रगस्त वाढवावी, अशी मागणी करण्यात येत आहे. प्रशासन आणि महावितरणने तातडीने लक्ष न दिल्यास ग्रामस्थांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा पुणे जिल्हा परिषद स्थायी समितीचे सदस्य राजेंद्र पोपटराव गावडे यांनी दिला आहे.

## पाणीटंचाईमुळे उन्हाळी भुईमूग जळाला



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव** : आंबेगाव तालुक्यातील थोरांदळे गाव परिसरात तीव्र पाणीटंचाईमुळे उन्हाळी भुईमूग पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून अनेक शेतकऱ्यांची पिके अक्षरशः जळून खाक झाली आहेत. उशिरा मिळालेल्या पाण्याच्या आवर्तनामुळे शेतकरी हवालदिल झाले असून नुकसानभरपाईची मागणी जोर धरू लागली आहे.

थोरांदळे गाव डिंभे धरणाच्या डाव्या कालव्यावरील घोड शाखेवर अवलंबून आहे. यंदा घोड शाखेला उन्हाळी पाण्याचे आवर्तन उशिराने सोडण्यात आल्याने परिसरात तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली. याचा सर्वाधिक फटका उन्हाळी भुईमूग पिकाला बसला आहे. फुटाणे मळा परिसरातील शेतकरी संजय टेमगिरे यांच्यासह अनेक शेतकऱ्यांनी मोठ्या अपेक्षेने उन्हाळी भुईमुगाची लागवड केली होती. मात्र वेळेवर पाणी उपलब्ध न झाल्याने पिकांना आवश्यक ओलावा मिळाला नाही. वाढत्या उन्हाच्या तीव्रतेमुळे भुईमुगाची पिके जळून गेली असून शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. या भागातील बहुतांश शेतकरी दुग्ध व्यवसायावर अवलंबून आहेत. जनावरांसाठी मका घास, कडवळ यांसारखी चारा पिके घेतली जातात. मात्र पाण्याअभावी ही चारा पिकेदेखील वाळून गेल्याने जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.

दरम्यान, जलसंपदा विभागाने नुकतेच घोड शाखेला पाण्याचे आवर्तन सोडले असले तरी तोपर्यंत अनेक पिकांचे नुकसान झाले होते. वेळेत पाणी मिळाले असते तर पिके वाचली असती, अशी भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली. सध्या झालेल्या नुकसानीमुळे परिसरातील शेतकरी संकटात सापडले असून प्रशासनाने तातडीने पंचनामे करून नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून करण्यात येत आहे.

## उत्तर पुणे जिल्ह्यात पुन्हा रेल्वेच्या आशा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**अवसरी** : खेड, आंबेगाव आणि जुन्नर तालुक्यात गेल्या तीन दशकांपासून रेल्वेचे स्वप्न रंगवले जात असताना, रेल्वे डबे वाहून नेणारा कंटेनर पाहून नागरिकांच्या भावना पुन्हा जागृत झाल्या आहेत. मंचर परिसरातून रेल्वेचे डबे घेऊन जाणारा मोठा कंटेनर जाताना दिसताच काही काळ परिसरात "रेल्वे आली" अशीच चर्चा रंगली होती.

उत्तर पुणे जिल्ह्यात रेल्वे मार्ग व्हावा, यासाठी अनेक वर्षांपासून मागणी होत आहे. विविध स्तरांवर रेल्वे मार्गाबाबत चर्चा झाल्या, काही ठिकाणी भूसंपादन प्रक्रियाही राबविण्यात आली होती. त्यामुळे खेड, आंबेगाव आणि जुन्नर तालुक्यातून रेल्वे धावणार, अशी नागरिकांची अपेक्षा वाढली होती. मात्र, नंतर प्रस्तावित रेल्वे मार्ग अहिल्यानगरकडे वळविण्यात आल्याने नागरिकांमध्ये मोठी नाराजी निर्माण झाली.



दरम्यान, मंचर परिसरात रेल्वेचे डबे वाहून नेणारा कंटेनर दिसताच अनेकांनी उत्सुकतेपोटी मोबाईलमध्ये फोटो आणि व्हिडिओ टिपले. काहींनी हे फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करत "आमच्या भागात रेल्वे आली" अशा मजेशीर प्रतिक्रिया व्यक्त केल्या.

प्रत्यक्षात रेल्वे मार्गाचा याच्याशी कोणताही संबंध नसला तरी कंटेनरवरील रेल्वे डब्यांनी अनेकांच्या मनातील अपूर्ण रेल्वे स्वप्नांना पुन्हा उजाळा दिला. उत्तर पुणे जिल्ह्यात रेल्वेची प्रतीक्षा आजही कायम असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

## डिंभे उजव्या कालव्याला पाण्याची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर** : वाढत्या उन्हाच्या तीव्रतेमुळे विहिरींनी तळ गाठल्याने आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात पिण्याच्या पाण्यासह जनावरांच्या हिरव्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. त्यामुळे पाटबंधारे विभागाने डिंभे धरणातून डिंभे उजव्या कालव्याला तातडीने पाणी सोडावे, अशी मागणी जिल्हा परिषद सदस्य विष्णू काका हिंगे पाटील यांनी केली आहे.

तालुक्याच्या पूर्व भागातील पहाटदरा, शिरदाळे, लोणी, धामणी, वडगावपीर, मांदळवाडी, खडकवाडी, रानमळा आदी गावांमध्ये मार्च महिन्यातच विहिरींनी तळ गाठला आहे. त्यामुळे काही गावांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. तर निघोटवाडी, शेवाळवाडी, अवसरी खुर्द, अवसरी बुद्रुक, गावडेवाडी, मेंगडेवाडी, जारकरवाडी या गावांतील शेती पूर्णपणे डिंभे उजव्या कालव्याच्या पाण्यावर अवलंबून



आहे. या भागातील बहुतांश शेतकरी भाजीपाला शेतीसोबत जोडधंदा म्हणून दुग्ध व्यवसाय करतात, तर काही शेतकरी ऊस पिक घेतात.

यंदा मार्च महिन्यापासूनच उन्हाची तीव्रता वाढल्याने हिरवा चारा, भाजीपाला, कडवळ, मका आणि उन्हाळी बाजरीची पिके पाण्याअभावी जळू लागली आहेत. विहिरी कोरड्या पडल्याने पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न गंभीर बनला आहे. त्यामुळे तातडीने डिंभे उजव्या कालव्याला पाणी सोडावे, अशी मागणी शेतकऱ्यांसह विष्णू काका हिंगे पाटील यांनी केली आहे. दुभत्या गाईंना मका, गवत, गाजर आणि कडवळ यांसारखा हिरवा चारा मिळत नसल्याने त्याचा परिणाम दूध उत्पादनावर होत आहे. परिणामी दुग्ध व्यवसाय अडचणीत येऊ लागला आहे.

माजी सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी पाटबंधारे मंत्र्यांशी चर्चा करून जनावरांच्या हिरव्या चाऱ्याचा तसेच पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लावावा आणि तातडीने डिंभे उजव्या कालव्याला पाणी सोडावे, अशी मागणी पंचायत समिती सदस्य अंकिता अनिल वाळुंज यांनी केली आहे.

## विरोधकांची जिल्हाधिकाऱ्यांकडे धाव

# हिंगणेवाडी-सपकळवाडी प्रभाग रचनेवर वाद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**भवानीनगर** : इंदापूर तालुक्यातील हिंगणेवाडी, सपकळवाडी आणि सणसर ग्रामपंचायतींच्या २०२६ च्या प्रभाग रचना प्रक्रियेवर गंभीर आक्षेप घेत विरोधकांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल केली आहे. प्रभाग रचना विरोधकांना विश्वासात न घेता आणि ग्रामसभेऐवजी निवडक ठिकाणी जाहीर केल्याचा आरोप करण्यात आला असून संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी करण्यात आली आहे.

हिंगणेवाडीचे माजी उपसरपंच संतोष चव्हाण आणि सपकळवाडीचे माजी ग्रामपंचायत सदस्य शत्रुघ्न घाडगे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. लवकरच ग्रामपंचायतींच्या पंचवार्षिक निवडणुका होणार असल्याने नुकतीच प्रभाग रचना जाहीर करण्यात आली. मात्र, तहसीलदार, मंडल अधिकारी आणि तलाठी यांनी विरोधी गटाला विश्वासात न घेता केवळ सत्ताधाऱ्यांसोबत चर्चा करून ही प्रक्रिया पार पाडल्याचा आरोप करण्यात आला आहे.

ग्रामस्थांच्या मते, प्रभाग रचना गावातील ग्रामसभेत जाहीर होणे अपेक्षित असताना ती श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या विश्रामगृहात पार पडली. त्यामुळे प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून निवडणूक प्रक्रियेवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. माहिती अधिकारातून मिळालेल्या उत्तरांमध्ये जिल्हाधिकारी कार्यालयाकडून अंतिम मान्यताप्राप्त कागदपत्रे प्राप्त झालेली नसल्याचे नमूद करण्यात आले आहे. असे असताना तहसीलदार जीवन बनसोडे यांनी ४ मे रोजी अंतिम प्रभाग रचना कोणत्या अधिकाराने जाहीर केली, असा सवाल आहे.

सपकळवाडीतील वॉर्ड क्रमांक ३ संदर्भातही नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. भौगोलिक सलगता आणि लोकसंख्येच्या निकषांकडे दुर्लक्ष करून प्रभाग रचना करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच २०२० मध्ये तीन सदस्यीय रचना असलेल्या वॉर्ड क्रमांक ३ मधील मतदारांना मिळालेला "तीन मतांचा अधिकार" यंदा नाकारण्यात आल्याने संताप व्यक्त केला जात आहे. ग्रामस्थांनी ग्रामसेवक उज्वला भगत, ग्रामसेवक अरुण जाधव, मंडल अधिकारी शरद गोडे यांच्यासह संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांवर अधिकारांचा दुरुपयोग, दिशाभूल आणि नियमभंगाचे आरोप केले आहेत. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८, ग्रामपंचायत निवडणूक नियम तसेच भारतीय न्याय संहितेअंतर्गत कारवाईची मागणी करण्यात आली आहे.

या प्रक्रियेविरोधात संतोष चव्हाण, कृष्णा कदम, कुमार गीरी, शत्रुघ्न घाडगे आणि अभयसिंह निंबाळकर यांनी अधिकृत हरकती आणि लेखी जबाब सादर केले होते. मात्र त्याची दखल न घेता प्रभाग रचना "जैसे थे" ठेवल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

संबंधित अधिकाऱ्यांचे निलंबन करून विभागीय किंवा न्यायालयीन चौकशी नेमावी, अन्यथा उच्च न्यायालयात याचिका दाखल करून संपूर्ण प्रभाग रचना प्रक्रिया रद्द करण्यासाठी कायदेशीर लढा उभारला जाईल, असा इशारा संतोष चव्हाण आणि शत्रुघ्न घाडगे यांनी दिला आहे.

## मंचर बाजार समितीत कैरीची मोठी आवक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर** : कृषी उत्पन्न बाजार समिती, मंचर येथे कैरीची मोठ्या प्रमाणावर आवक झाली असून दहा किलोला ४०० रुपयांपर्यंत बाजारभाव मिळाला आहे. तरकारी व फळभाज्यांच्या बाजारभावात किंचित वाढ झाल्याची माहिती सभापती निलेश थोरात यांनी दिली.

कृषी उत्पन्न बाजार समितीत तरकारी शेतमालाची एकूण ७ हजार ९३० डाग इतकी आवक झाली. बाजार समितीत विविध भाजीपाला आणि फळभाज्यांना पुढीलप्रमाणे बाजारभाव मिळाला. कंसात मालाची आवक दर्शविण्यात आली आहे.

कैरी (८७८) : १० ते ४०० रुपये, फरशी (५) : ५०० ते १००० रुपये, लिंबू (७) : २७० ते २००० रुपये, गवार (६०६) : ५० ते ६०० रुपये, घेवडा (१८) : ४०० ते ५७० रुपये, मिरची (४३३) : ७० ते ६०१ रुपये, अघोरा (४) : २० ते ६० रुपये, आले (२२) : १५० ते ७०० रुपये, काकडी (७८७) : ३० ते ३५१ रुपये, कारले (१६२) : १८० ते ४०० रुपये, कोबी (४७५) : २० ते १०० रुपये, गाजर (२५) : १०० ते १७० रुपये, घोसाळी (१) : १२० रुपये, चवळी (७८) : १०० ते ३५० रुपये, टोमॅटो (१३४) : १०० ते ५५० रुपये, ढोबळी मिरची (२११) : ५० ते ५०० रुपये, तोंडली (१२३) : ८० ते ४०० रुपये.

## सारांश वृत्त

### सिक्कीममध्ये सम-विषम वाहन निर्बंध

**गंगटोक:** इंधनाची बचत करण्यासाठी सिक्कीम सरकारने राज्यभरात सम-विषम वाहन निर्बंध नियमाची अंमलबजावणी सुरू केली असून, प्रवाशांना होणारा त्रास कमी करण्यासाठी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक मजबूत केली आहे, असे एका अधिकाऱ्याने सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकांना इंधनाचा वापर कमी करण्याचे आणि अधिक काटकसरीने खर्च करण्याचे आवाहन केल्यानंतर ही अंमलबजावणी करण्यात आली.

### बंगाल सरकार तोडफोड खपवून घेणार नाही

**कोलकाता** : पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांनी सोमवारी ठामपणे सांगितले की, धार्मिक घोषणांच्या नावाखाली होणाऱ्या तोडफोडीविरोधात त्यांचे सरकार 'शून्य सहनशीलता' धोरण अवलंबेल. अराजकतेविरोधात कडक संदेश देताना अधिकारी म्हणाले की, पोलीस कर्मचाऱ्यांवर हल्ला करणाऱ्या आणि सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणाऱ्यांविरुद्ध राज्य सरकार कठोर कायदेशीर कारवाई करण्यास मागेपुढे पाहणार नाही. कोलकाताच्या तिलजाला येथे झालेल्या बुलडोझर कारवाईविरोधातील आंदोलनाला हिंसक वळण लागल्यानंतर दुसऱ्याच दिवशी मुख्यमंत्र्यांनी ही टिप्पणी केली आहे.

### माल उतरवण्याच्या वादातून गोळीबार

**नवी दिल्ली** : ईशान्य दिल्लीतील मौजपूर परिसरात माल उतरवणाऱ्या काही मजुरांसोबत झालेल्या वादातून गोळीबार केल्याप्रकरणी एका ३७ वर्षीय व्यक्तीला अटक करण्यात आली आहे, अशी माहिती पोलिसांनी सोमवारी दिली. त्याच्या ताब्यातून एक सेमी-ऑटोमॅटिक पिस्तूल आणि सहा जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली. ही घटना १६ आणि १७ मे च्या मध्यरात्री जाफराबाद परिसरात घडली. तक्रारदार सौरभ (१९) याने सांगितले की, तो आणि वाहक व मजूर माल उतरवत असताना, एका गाडीतून एक माणूस बाहेर आला आणि त्याने त्यांना त्यांचे वाहन बाजूला घेण्यास सांगितले.

## यूएपीए प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाचे महत्त्वपूर्ण निरीक्षण

# जामीन हा नियम, तुरुंगवास अपवाद

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** बेकायदेशीर कृत्य प्रतिबंधक कायदा (यूएपीए) सारख्या कठोर कायद्यांअंतर्गत दाखल प्रकरणांमध्येही "जामीन हा नियम असून तुरुंगवास हा अपवाद आहे," असा महत्त्वपूर्ण पुनरुच्चार सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी केला. तसेच, २०२० दिल्ली दंगल कट प्रकरणात कार्यकर्ते उमर खालिद यांना जामीन नाकारणाऱ्या पूर्वीच्या निर्णयाबाबतही न्यायालयाने चिंता व्यक्त केली.

जम्मू-काश्मीरमधील कथित अमली पदार्थ तस्करी आणि दहशतवादी वित्तपुरवठा प्रकरणातील आरोपी सय्यद इफ्तिखार अंद्राबी यांना जामीन मंजूर करताना न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना आणि न्यायमूर्ती उज्जल भुयान यांच्या खंडपीठाने हे निरीक्षण नोंदवले. राष्ट्रीय तपास यंत्रणा (एनआयए) २०२० मध्ये नोंदवलेल्या या प्रकरणाची यूएपीए आणि भारतीय दंड संहितेच्या विविध कलमांखाली चौकशी करत आहे. हंदवारा येथील रहिवासी अंद्राबी यांनी जम्मू-काश्मीर आणि लडाख उच्च न्यायालयाने जामीन अर्ज फेटाळल्याच्या आदेशाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते.

तपास यंत्रणेनुसार, मोबाईल फोन नोंदींमधून अंद्राबी यांचे सीमेपलीकडील दहशतवादी घटकांशी संबंध असल्याचे दिसून आले होते. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने अंद्राबी यांना पासपोर्ट जमा करणे आणि दर १५ दिवसांनी स्थानिक पोलीस ठाण्यात हजेरी लावणे या अटींसह जामीन मंजूर केला.

खंडपीठाने स्पष्ट केले की, यूएपीएच्या कलम ४३डी(५) अंतर्गत जामीन मंजुरीवर कठोर निर्बंध असले तरी त्याचा वापर एखाद्या व्यक्तीला अनिश्चित काळ तुरुंगात ठेवण्यासाठी करता येणार नाही. हे कलम संविधानातील अनुच्छेद २१ आणि २२ च्या चौकटीतच लागू राहिले पाहिजे, असे न्यायालयाने नमूद केले. "जामीन हा नियम आणि तुरुंगवास हा अपवाद आहे, हे संविधानातील अनुच्छेद २१ आणि २२ मधून उद्भवणारे मूलभूत तत्त्व आहे. निर्दोषत्वाची धारणा ही कायद्याच्या राज्यावर आधारित कोणत्याही सुसंस्कृत समाजाची पायाभूत संकल्पना आहे," असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले.

न्यायालयाने २०२१ मधील 'युनियन ऑफ इंडिया विरुद्ध के. ए. नजीब' या निकालाचाही पुनरुच्चार केला. या निकालानुसार, यूएपीए प्रकरणांमध्ये दीर्घकाळ तुरुंगवास आणि खटल्यातील विलंबामुळे मूलभूत अधिकारांचे उल्लंघन होत असल्यास घटनात्मक न्यायालयांना जामीन मंजूर करण्याचा अधिकार आहे. खंडपीठाने नमूद केले की, के. ए. नजीब प्रकरणातील तत्त्वे बंधनकारक कायदा असून कनिष्ठ न्यायालये किंवा लहान खंडपीठांना त्याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. सुनावणीदरम्यान न्यायालयाने या तत्त्वांपासून दूर जाणाऱ्या काही नंतरच्या निर्णयांबाबत चिंता व्यक्त केली. त्यात जानेवारी २०२६ मध्ये उमर खालिद आणि जेएनयू विद्यार्थी शरजील इमाम यांना दिल्ली दंगल कट प्रकरणात जामीन नाकारणाऱ्या निर्णयाचाही समावेश होता.

जानेवारी २०२६ मधील त्या निकालात सर्वोच्च न्यायालयाने उमर खालिद आणि शरजील इमाम यांच्यावरील आरोप प्रथमदर्शनी यूएपीए अंतर्गत गंभीर स्वरूपाचे असल्याचे नमूद केले होते. आरोपांचे गांभीर्य आणि तपास यंत्रणेने सादर केलेले पुरावे लक्षात घेता त्या टप्प्यावर जामीन मंजूर करणे उचित नसल्याचे न्यायालयाने म्हटले होते. मात्र, सोमवारीच्या सुनावणीत न्यायमूर्ती उज्जल भुयान यांनी विशेष कायद्यांखालील जामीन अर्जांवर निर्णय घेताना आरोपींचा दीर्घकाळचा तुरुंगवास आणि खटल्यातील विलंब या बाबींकडे दुर्लक्ष करता येणार नसल्याचे स्पष्ट केले.

## जमीन व्यवहार प्रकरणातील याचिका वद्रा यांनी घेतली मागे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** उद्योगपती आणि काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांचे पती रॉबर्ट वद्रा यांनी हरियाणातील जमीन व्यवहाराशी संबंधित मनी लाँड्रिंग प्रकरणात दाखल केलेली याचिका सोमवारी दिल्ली उच्च न्यायालयातून मागे घेतली. या याचिकेद्वारे त्यांनी सत्र न्यायालयाने चौकशीसाठी बजावलेल्या समन्सला आव्हान दिले होते. हे प्रकरण गुरुग्राम जिल्ह्यातील मानेसर-शिकोहपूर, सध्याच्या सेक्टर ८३ परिसरातील जमीन व्यवहाराशी संबंधित आहे.

न्यायमूर्ती मनोज जैन यांनी दिलेल्या आदेशात म्हटले की, वद्रा यांच्या वकिलांनी न्यायालयाला सांगितले की याचिकाकर्त्यांना ही याचिका पुढे चालवण्यात स्वारस्य नसून ती बिनशर्त मागे घ्यायची आहे. वद्रा यांच्या वकिलांनी योग्य टप्प्यावर सत्र न्यायालयासमोर संबंधित कायदेशीर मुद्दे मांडले जातील, असे न्यायालयात सांगितले. त्यानंतर न्यायालयाने सर्व पक्षांचे हक्क आणि युक्तिवाद खुले ठेवत याचिका निकाली काढली.

गेल्या आठवड्यात अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) या याचिकेला विरोध करताना ती चुकीच्या कायदेशीर मांडणीवर आधारित असल्याचा दावा केला होता. वद्रा यांचे वरिष्ठ वकील अभिषेक सिंघवी यांनी न्यायालयात युक्तिवाद करताना भारतीय दंड संहिता आणि भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत दाखल गुन्हे संबंधित काळात मनी लाँड्रिंग प्रतिबंधक कायद्याच्या अनुसूचित गुन्ह्यांच्या यादीत नव्हते, त्यामुळे ईडीला चौकशीचा अधिकार नसल्याचे म्हटले होते.

सिंघवी यांनी जमीन व्यवहार २००८ ते २०१२ दरम्यान झाल्याचे नमूद करत, ईडी ज्या गुन्ह्यांवर आधार घेत आहे ते २०१३ आणि २०१८ मध्येच अनुसूचित गुन्ह्यांच्या यादीत समाविष्ट करण्यात आल्याचा दावा केला. मात्र, ईडीच्या वकिलांनी हा युक्तिवाद फेटाळून लावत तो कायद्याचे चुकीचे आणि दिशाभूल करणारे स्पष्टीकरण असल्याचे सांगितले.

## केरळमध्ये महिलांना मोफत बसप्रवास

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**तिरुवनंतपुरम :** सत्तेवर आल्यानंतर झालेल्या पहिल्याच मंत्रिमंडळ बैठकीत नव्या यूडीएफ सरकारने दोन महत्त्वाच्या निवडणूक आश्वासनांची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला. महिलांना केएसआरटीसी बससेवेत मोफत प्रवास आणि आशा कार्यकर्त्यांच्या मानधनात वाढ यास मंत्रिमंडळाने सोमवारी मंजुरी दिली.

मुख्यमंत्री व्ही. डी. सतीशन यांनी पत्रकार परिषदेत ही घोषणा केली. त्यांनी सांगितले की, १५ जूनपासून महिलांना केएसआरटीसी बसमधून मोफत प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे. या योजनेची अंमलबजावणी, नियम व मार्गदर्शक तत्त्वे लवकरच जाहीर करण्यात येतील. यूडीएफने विधानसभा निवडणूक प्रचारात 'इंदिरा गॅरंटी' अंतर्गत हे महत्त्वाचे आश्वासन दिले होते.

मंत्रिमंडळाने आशा कार्यकर्त्यांच्या मासिक मानधनात ३ हजार रुपयांची वाढ करण्यालाही मंजुरी दिली. सध्या मिळणारे ९ हजार रुपये मानधन वाढून आता १२ हजार रुपये होणार आहे. ही वाढ पहिल्या टप्प्यातील असून, पुढील काळात आणखी वाढ करण्याबाबत विचार केला जाईल, असे मुख्यमंत्री म्हणाले.

आशा कार्यकर्त्यांच्या प्रलंबित मागण्या पूर्ण करण्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याचे सांगताना सतीशन यांनी राज्याच्या आर्थिक परिस्थितीमुळे सध्या ३ हजार रुपयांचीच वाढ शक्य झाल्याचे स्पष्ट केले. आशा कार्यकर्त्यांच्या मानधनवाढीचाही मुद्दा यूडीएफच्या निवडणूक प्रचारातील प्रमुख आश्वासनांपैकी एक होता.

## भारतातील १३८ शहरे 'प्रदूषित आणि श्रीमंत'

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बंगळूरु :** भारतातील शहरी विकास अजूनही मोठ्या प्रमाणावर पेट्रोल-डिझेल आणि दगडी कोळसा यांसारख्या जीवाश्म इंधनांवर अवलंबून असल्याने शहरांमधील प्रदूषण झपाट्याने वाढत असल्याचे एका आंतरराष्ट्रीय अभ्यासातून समोर आले आहे. 'नेचर सिटीज' या नियतकालिकात प्रसिद्ध झालेल्या अहवालानुसार, जगातील 'अधिक प्रदूषित आणि अधिक समृद्ध' अशा ३९० शहरांपैकी १३८ शहरे भारतातील आहेत. हा जागतिक प्रमाणातील सुमारे ३५.४ टक्के वाटा आहे.

या अभ्यासात जगभरातील ५ हजार ४३५ शहरांचा समावेश करण्यात आला होता. २०१९ ते २०२४ या कालावधीत उपग्रहांद्वारे मिळालेला नायट्रोजन डायऑक्साइड (एनओ२) डेटा आणि शहरांचे सकल देशांतर्गत उत्पादन (जीडीपी) यांचे विश्लेषण करून अहवाल तयार करण्यात आला.

संशोधकांनी वाहने, उद्योग आणि औष्णिक वीज प्रकल्पांतून निर्माण होणाऱ्या नायट्रोजन डायऑक्साइडच्या प्रमाणाचा अभ्यास केला. त्यानंतर शहरांची 'स्वच्छ आणि समृद्ध', 'प्रदूषित आणि समृद्ध', 'स्वच्छ आणि गरीब' तसेच 'प्रदूषित आणि गरीब' अशा चार गटांत विभागणी करण्यात आली. अभ्यासात समाविष्ट ९०२ भारतीय शहरांपैकी सुमारे १५.३ टक्के शहरांमध्ये २०१९ ते २०२४ दरम्यान नायट्रोजन डायऑक्साइडचे प्रमाण वाढल्याचे आढळून आले.

'प्रदूषित आणि समृद्ध' या श्रेणीत भारताचा वाटा जगात सर्वाधिक असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. संशोधकांच्या मते, ही शहरे आर्थिकदृष्ट्या वेगाने वाढत असली तरी त्याच वेगाने प्रदूषणही वाढत आहे. काही भारतीय शहरे 'प्रदूषित आणि गरीब' या अधिक चिंताजनक श्रेणीतही आढळली असून, त्या ठिकाणी आर्थिक प्रगती मर्यादित असताना प्रदूषण मात्र वाढत असल्याचे दिसून आले.

दिल्ली, मुंबई आणि कोलकाता यांसारख्या महानगरांनी तुलनेने 'स्वच्छ विकास' दर्शवला असला, तरी इतर अनेक शहरांमध्ये वाहतूक, उद्योग आणि वीज निर्मितीसाठी अजूनही जीवाश्म इंधनांवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून राहावे लागत असल्याचे अहवालात म्हटले आहे. विशेष म्हणजे, जगातील सर्वाधिक 'प्रदूषित आणि समृद्ध' अशा पहिल्या दहा शहरांच्या यादीत महाराष्ट्रातील नाशिक शहराचाही समावेश झाला आहे.

## मंदिर पुजाऱ्यांच्या वेतनवाढीसाठीची याचिका फेटाळली

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** राज्य-नियंत्रित मंदिरांमधील पुजारी, सेवादार आणि इतर कर्मचाऱ्यांचे वेतन व इतर लाभांचा आढावा घेऊन त्यात वाढ करण्याची मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली.

न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या खंडपीठाने म्हटले की, घटनेच्या कलम ३२ अंतर्गत अशी याचिका ग्राह्य धरता येणार नाही. संबंधित पीडित व्यक्तींना थेट न्यायालयात दाद मागण्याचा अधिकार असल्याचेही न्यायालयाने स्पष्ट केले. सर्वोच्च न्यायालयाने याचिकाकर्ते वकील अश्विनी उपाध्याय यांना पुजारी आणि मंदिर कर्मचाऱ्यांच्या उत्पन्नाविषयी पुरेशी माहिती नसताना त्यांच्या वैयक्तिक बाबींमध्ये हस्तक्षेप करू नये, असे सांगितले.

उपाध्याय यांनी न्यायालयात मांडणी करताना अलाहाबाद उच्च न्यायालयासह इतर उच्च न्यायालयांनी राज्य-नियंत्रित मंदिरांतील पुजाऱ्यांना सन्मानाने जीवन जगता यावे यासाठी वेतनाचा आढावा घेण्यासंदर्भात आदेश दिल्याचा दावा केला.

खंडपीठाने याचिकेवर पुढील सुनावणी घेण्यास नकार देत, कायद्यानुसार उपलब्ध पर्यायांचा अवलंब करण्याच्या मुभेसह याचिका मागे घेण्याची परवानगी उपाध्याय यांना दिली.

अधिवक्ता अश्वनी दुबे यांच्यामार्फत दाखल करण्यात आलेल्या याचिकेत केंद्र व राज्य सरकारांना न्यायिक आयोग किंवा तज्ज्ञ समिती स्थापन करण्याचे निर्देश देण्याची मागणी करण्यात आली होती. या समितीद्वारे राज्य-नियंत्रित मंदिरांतील पुजारी आणि कर्मचाऱ्यांना दिल्या जाणाऱ्या मानधन व इतर सुविधांचा आढावा घेण्याची विनंती करण्यात आली होती.

## अध्यक्ष एम. के. स्टॅलिन यांचा विश्वास

# डीएमके ताकदीने पुनरागमन करेल

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**तंजावर :** नुकत्याच झालेल्या निवडणुकीतील पराभवानंतर डीएमके पक्ष अधिक मजबूत होऊन पुन्हा उभारी घेईल, असा विश्वास डीएमके अध्यक्ष एम. के. स्टॅलिन यांनी सोमवारी व्यक्त केला.

तंजावर येथे तिरुवरूर डीएमके जिल्हा सचिव पूंडी के. कलाइवनन यांच्या कुटुंबीयांच्या विवाह सोहळ्यात बोलताना स्टॅलिन यांनी पक्ष कार्यकर्त्यांना पुन्हा सत्तेत येण्याच्या निर्धाराने काम करण्याचे आवाहन केले. "पक्षाला जेव्हा जेव्हा पराभवाचा सामना करावा लागला, तेव्हा तो फिनिक्स पक्ष्याप्रमाणे अधिक ताकदीने पुन्हा उभा राहिला," असे स्टॅलिन म्हणाले.

निवडणुकीनंतर पक्षाने स्थापन केलेल्या लेखापरीक्षण पथकाबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, वरिष्ठ पदाधिकाऱ्यांचा समावेश असलेले हे पथक पक्षाच्या त्रुटींचा सखोल अभ्यास करेल. कोणत्या मतदारसंघात विजय मिळाला आणि कोणत्या ठिकाणी पराभव झाला, यामागील कारणांचाही अभ्यास करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. स्टॅलिन यांनी सांगितले की, पक्ष कार्यकर्त्यांसह सामान्य जनतेलाही आपल्या सूचना आणि प्रतिक्रिया पक्षाने सुरू केलेल्या वेबसाइटवर नोंदवता येतील.

द्रविड मॉडेल सरकारच्या काळात सुरू करण्यात आलेल्या कल्याणकारी योजना नव्या सरकारनेही सुरू ठेवाव्यात, अशी मागणी आपण केली होती, असे सांगत स्टॅलिन म्हणाले, "त्या योजना सुरू ठेवल्या जात असल्याने एका अर्थाने आम्ही अजूनही सरकारमध्ये असल्यासारखेच आहे."

विरोधी पक्षनेते उदयनिधी स्टॅलिन यांनीही या वेळी डीएमके हा केवळ राजकीय पक्ष नसून सामाजिक चळवळ असल्याचे सांगितले. "निवडणुकीत विजय-पराजय होत असतात. मात्र डीएमके जनतेसाठी काम करत राहील," असे ते म्हणाले. "राज्याच्या हक्कांच्या संरक्षणासाठी आम्ही सातत्याने लढत राहू आणि राज्यासमोरील धोके दूर ठेवू," असेही उदयनिधी स्टॅलिन यांनी स्पष्ट केले.

## सीबीएसईकडून पुनर्मूल्यांकन शुल्कात कपात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने (सीबीएसई) विद्यार्थ्यांना पुनर्मूल्यांकन प्रक्रिया अधिक सुलभ करण्यासाठी शुल्कात मोठी कपात करण्याची घोषणा रविवारी केली. इयत्ता १२वीच्या निकालानंतर निर्माण झालेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे.

१३ मे रोजी सीबीएसईने बारावीचा निकाल जाहीर केला होता. त्यानंतर उत्तरपत्रिकांच्या मूल्यांकनासाठी वापरण्यात आलेल्या ऑन-स्क्रीन मार्किंग (ओएसएम) प्रणालीवर अनेक विद्यार्थ्यांनी आक्षेप घेत अपेक्षेपेक्षा कमी गुण मिळाल्याची तक्रार केली होती. यंदा एकूण उत्तीर्णतेची टक्केवारीही ८८.३९ टक्क्यांवरून ८५.२ टक्क्यांपर्यंत घसरली आहे.

कर्तव्य भवन येथे शालेय शिक्षण सचिव संजय कुमार आणि सीबीएसई अध्यक्ष राहुल सिंह यांच्या उपस्थितीत आयोजित पत्रकार परिषदेत नव्या गुणदान पद्धतीबाबत स्पष्टीकरण देण्यात आले. मंत्रालयाने ओएसएम पद्धत पारंपरिक कागदी मूल्यमापनापेक्षा अधिक प्रभावी असल्याचा दावा केला. ही पद्धत यापूर्वी २०१४ मध्ये लागू करण्यात आली होती; मात्र तांत्रिक अडचणींमुळे ती नंतर बंद करण्यात आली होती.

संजय कुमार यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांना आता उत्तरपत्रिका पाहण्यासाठी ७०० रुपयांऐवजी केवळ १०० रुपये शुल्क भरावे लागेल.

गुण पडताळणी किंवा प्रमाणीकरणासाठीचे शुल्क ५०० रुपयांवरून १०० रुपये करण्यात आले आहे. तसेच, एखाद्या विशिष्ट प्रश्नाच्या फेरतपासणीसाठी प्रति प्रश्न १०० रुपयांऐवजी २५ रुपये आकारले जातील. पुनर्मूल्यांकनानंतर विद्यार्थ्यांचे गुण वाढल्यास भरलेले शुल्क परत करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

सीबीएसई अध्यक्ष राहुल सिंह यांनी सांगितले की, विद्यार्थी १९ ते २२ मेदरम्यान पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज करू शकतील. विशिष्ट प्रश्नांच्या फेरतपासणीसाठी २६ ते २९ मेदरम्यान अर्ज स्वीकारले जातील. निर्धारित कालावधीनंतरही मागणी कायम राहिल्यास त्याचाही विचार केला जाईल, असे त्यांनी नमूद केले.

## 'आप' नेते दीपक सिंगला यांना अटक

**नवी दिल्ली :** दिल्ली आणि गोव्यात शोधमोहीम राबवल्यानंतर अंमलबारी संचालनालयाने (ईडी) सोमवारी 'आप'चे नेते दीपक सिंगला यांना कथित मनी लाँड्रिंग प्रकरणात अटक केली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी सोमवारी दिली. सिंगला हे दिल्लीतील विश्वास नगर विधानसभा मतदारसंघातून आम आदमी पार्टीचे (आप) उमेदवार होते. एका तपासाचा भाग म्हणून २०२४ मध्येही ईडीने त्यांच्यावर छापा टाकला होता. हे प्रकरण बँक कर्ज घोटाळ्याचा परिणाम आहे.

## झारखंडमधील न्यायालये 'हायब्रीड मोड'मध्ये

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**रांची :** राज्यातील ऊर्जा आणि इंधन संकटाच्या पार्श्वभूमीवर झारखंड उच्च न्यायालयाने सर्व कनिष्ठ न्यायालयांना तात्काळ प्रभावाने 'हायब्रीड मोड'मध्ये कामकाज करण्याचे निर्देश दिले आहेत. या पद्धतीत प्रत्यक्ष आणि ऑनलाइन अशा दोन्ही माध्यमांतून न्यायालयीन प्रक्रिया पार पडणार आहे.


या नव्या व्यवस्थेनुसार व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सुनावणी आणि साक्षीदारांची साक्ष नोंदविण्याची परवानगी देण्यात आली असून, त्यामुळे न्यायिक कामकाजात कोणताही अडथळा येणार नाही, असा विश्वास न्यायालयाने व्यक्त केला आहे. उच्च न्यायालयाचे रजिस्ट्रार जनरल सत्यप्रकाश सिन्हा यांनी या संदर्भात राज्यातील सर्व जिल्हा व सत्र न्यायाधीश तसेच रांचीचे न्यायिक आयुक्त यांना पत्र जारी केले आहे. सरन्यायाधीश एम. एस. सोनाक यांच्या निर्देशानुसार हा निर्णय घेण्यात आल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे.

सर्व प्रमुख जिल्हा न्यायालयांमध्ये हायब्रीड प्रणाली लागू करण्याबरोबरच न्यायिक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी कार-पूलिंग आणि वाहन-सामायिकरण व्यवस्था सुरू करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. इंधन बचतीसाठी ही पावले आवश्यक असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. वकील, साक्षीदार आणि पक्षकारांना डिजिटल प्रणालीचा अधिकाधिक वापर करण्याचे आवाहन केले आहे. व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे आभासी उपस्थितीला प्रोत्साहन देण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

## शशी थरूर यांचे प्रत्युत्तर सोशल मीडियावर व्हायरल

# रसगुल्ला म्हणजे पाकातील इडली? नवा वादंग

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** सोशल मीडियावर खाद्यपदार्थांवरून सुरू होणाऱ्या चर्चांना अनेकदा विनोदी वळण मिळते. पाणीपुरी विरुद्ध समोसा, राजमा-राईस विरुद्ध कढी-राईस अशा चर्चांनंतर आता रसगुल्ला आणि इडली यांची तुलना सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरली आहे. या वादात काँग्रेस खासदार शशी थरूर यांनी उडी घेतल्याने हा मुद्दा आणखी गाजू लागला आहे.

ही चर्चा तेव्हा सुरू झाली, जेव्हा 'सायंतिका' नावाच्या एका सोशल मीडिया वापरकर्त्याने 'मिष्टी दोई' आणि 'नोलन गुरेर रसगुल्ला' यांची प्रशंसा करत, गैर-बंगाली लोकांना या मिठाईची चव कशी समजावून सांगावी, असा प्रश्न विचारला.

यानंतर दुसऱ्या एका युझरने पोस्ट रीपोस्ट करत, "रसगुल्ला म्हणजे साखरेच्या पाकात बुडवलेली इडली आहे आणि तो सर्वात जास्त गाजावाजा झालेला गोड पदार्थ आहे," अशी टिप्पणी केली. ही पोस्ट काही तासांतच व्हायरल झाली आणि तिला अडीच लाखांहून अधिक व्ह्यूज मिळाले. या पोस्टवर प्रतिक्रिया देताना 'काशिका' नावाच्या एका युझरने गंमतीने लिहिले, "जर शशी थरूर यांना हे समजले, तर एका भाषिक वादळासाठी तयार रहा." त्यानंतर थरूर यांनी आपल्या खास शैलीत या वादात सहभाग घेतला.

शशी थरूर यांनी रसगुल्ला आणि इडली यांची तुलना चुकीची असल्याचे सांगत त्यामागील खाद्यवैज्ञानिक कारण स्पष्ट केले. त्यांनी म्हटले की, "रसगुल्ला हा नाजूक छेन्यापासून तयार केला जातो आणि तो पाक शोषून घेण्यासाठी स्पंजसारखे काम करतो. दुसरीकडे, इडली ही आंबवलेल्या तांदूळ आणि उडीद डाळीपासून वाफवून तयार केली जाते. त्यामुळे या दोन्ही पदार्थांची रचना, चव आणि पोत पूर्णपणे वेगळी आहे."

थरूर यांनी इडलीचे विशेष कौतुक करताना तिला "दक्षिण भारतीय पाककलेतील उत्कृष्ट कलाकृती" असे संबोधले. "उत्तम इडली बनवणे हे जैवतंत्रज्ञानाचे अप्रतिम उदाहरण आहे. मसालेदार सांबार किंवा पोडी मसाल्याचा स्वाद शोषून घेण्यासाठी ती बनवली जाते," असेही त्यांनी नमूद केले. समारोप करताना त्यांनी विनोदी शैलीत लिहिले, "तुम्हाला रसगुल्ला आवडत नसेल, तर त्याच्या उणिवांवर बोला. पण इडलीच्या प्रतिष्ठेला तुमच्या मिठाईवरील चर्चेत ओढू नका."

थरूर यांच्या प्रतिक्रियेनंतर सोशल मीडियावर अनेक मजेशीर प्रतिक्रिया उमटल्या. एका युझरने, "आता मी लगेच इडली-सांबार ऑर्डर करतोय," असे लिहिले. दुसऱ्याने, "सर्व एआय मॉडेल्स शशी थरूर यांच्या ट्विट्सवरूनच प्रशिक्षित होत असावीत," अशी टिप्पणी केली. तर आणखी एका युझरने, "हे इंग्रजी लेखनाचे मास्टरक्लास आहे," असे म्हटले. एका युझरने तर थरूर यांना "सर्वोत्तम रसगुल्ला पाठवण्याची" ऑफर देत चर्चेला रंगत आणली.